# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**सभा क्रमांक - ०४ सोमवार दिनांक १९/१०/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहात होणा-या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| २१ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१९-२०२० चे सुधारित व सन २०२० - २०२१ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह) |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १२/१०/२०२०.
अहमदनगर.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय जा.क्र. : अम/सका- ०४** **दिनांक : १२-१०-२०२०.**

**अहमदनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेची सुचना** (ऑनलाईन ॲप व्दारे)**.**

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०४, सोमवार दिनांक १९/१०/२०२०.**

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.....................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस-

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ (अ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक १९/१०/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहात** ऑनलाईन ॲप व्दारे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

तरी आपणांस सदर सभेस ॲप व्दारे ऑनलाईन सहभागी होण्याची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**टिप :-** १) प्रत्येक सदस्याने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरुन AMC Corporator official What's App मध्ये निर्देश दिल्यानुसार ॲप डाउन लोड करुन घेणे.
२)वरिलप्रमाणे ॲप व्दारे प्रत्येक सदस्यांना मा.महासभेस उपस्थित राहता येईल.
३)मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये व दिनांक ०९ सप्टेंबर २०२० च्या पत्रान्वये कळविले नुसार सदरची सभा ऑनलाईन ॲप व्दारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा. सदस्यांनी महानगरपालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०१ / २०१९.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक :    १८-०६-२०१८.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.......................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस-

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २५-०६-२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित केली होती. या सभेत अंदाजपत्रक सादर केल्यानंतर त्यावर अभ्यासासाठी सदस्यांना अवधी मिळावा या मागणीनुसार सदरची सभा मा.महापौर यांनी तहकुब करुन, **तहकुब सभा बुधवार दिनांक २६/०६/२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** पुढे सुरु होईल असे आदेशीत केले आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०४ प्रस्ताव क्रमांक : २१ दिनांकः- १९/१०/२०२०**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१९-२०२० चे सुधारित व सन २०२० - २०२१ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह)

**--*--**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंती टिप्पणी देण्यात येते की, सन २०१९-२०२० चे सुधारीत व सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २ महानगरपालिका, नगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज यामधील मा.स्थायी समितीचे कामकाज (३)(के) अन्वये मान्यता झाल्याचे कायद्यान्वये अधोरेखीत झाले आहे. त्यामुळे सन २०१९-२०२० चे सुधारीत व सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह) चा विषय मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यांत यावा हि विनंती.

---*---

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** सभेचे कामकाज चालू करा.

मा.आयुक्त साहेब यांनी मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांना सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला.

**मुख्यलेखाधिकारी :-** काल सोमवार दिनांक १८/१०/२०२० रोजी मा.आयुक्त यांनी मा.महापौर यांचेकडेस सन २०२०-२०२१ चे अहमदनगर महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सादर केले. अंदाजपत्रकाच्या प्रती आपल्याला मिळाल्या असतीलच, अंदाजपत्रकाचे वाचन करतो. पा.क्र.३ महसुली जमा दर-कर जमा बाजूचे वाचन करण्यांत आले. महत्वाच्या तरतुदींचे वाचन करीत आहे.

**मा.महापौर साहेब :-** जमा बाजुवर कोणाला बोलायचे आहे का ? जाहीरात करावर श्री.झिने बोला.

**मुख्यलेखाधिकारी :-** जाहीरात कराचे रेट ६६ लाख धरले आहेत. अग्निशमन विभाग पान नं.४ वरिल तरतुदींचे वाचन केले. त्यानंतर पान नंबर ५,६,७,८ चे वाचन करण्यांत आले.

**मा.महापौर साहेब :-** पान नंबर ४ पासुन चालू करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** अग्निशमन करा पासुन किती पैसे जमा होतात.

**मा.आयुक्त साहेब :-** ज्या ज्या मोठया स्कीम मध्ये फायर यंत्रणा बसवतो. त्यांना गव्हर्नमेंटने रेटने ठरविले नुसार आकारणी करुन वसुली करतो. त्याचे अपेक्षित उत्पन्न रक्कम रु.९.०० लाख धरले आहेत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** शहरामध्ये मोठमोठे बिल्डींगचे काम चालू आहे. तुमचा कर एवढा कमी का येतो. . १०-१५ मजली इमारतींना आग लागली तर अग्निशमन विभाग आपला सक्षम आहे का.

**मा.आयुक्त साहेब :-** आपल्या क्षेत्रात ज्या बिल्डींगा आहेत त्या अनुषंगाने दाखला देतो. त्याला फायर एन.ओ.सी.म्हणतात. अगोदर २५० रुपये धरले आहेत. बिल्डींग इन्स्पेक्शन करुन त्यानंतर एन.ओ.सी.दाखला देण्यांत येतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** महासभेत विभाग प्रमुख उपस्थित नाहीत. सगळया शहराला माहिती आहे महासभा आहे. मिसाळ येईपर्यंत थांबू. पुढचा विषय घ्या. वृक्षकर किती जमा होतो.

**श्री.झिने, रिव्हीजन :-** कराची एकुण मागणी १ कोटी १४ लाख आहे. यावर्षी रक्कम रु.१०.०० लाख वसुल आला. मागच्या वर्षी २५.०० लाख वसुल झाला.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** तरतुद १ कोटी होती.

**श्री.झिने, रिव्हीजन :-** सन २०२०-२०२१ तरतुद १ कोटी १० लाख पकडले.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** कोरोनाचे काळ असुन १ कोटी पकडले, फुगीर बजेट झाले आहे. मागच्या वर्षी १ कोटी पकडले व वसुली २५.०० लाख झाली. यावर्षी १ कोटी १० लाख पकडले १० लाख तरी वसुल होतील का.

**मा.महापौर साहेब :-** आपण कर वसुली गृहीत धरतो पण वसुली तेवढया प्रमाणात होत नाही. सगळे नागरीक कर भरत नाही. त्यामुळे कमी वसुल होतो. व बजेटमध्ये अपेक्षित येणे हे धरावेच लागते. सगळयांनी कर भरले तर एवढे अपेक्षित आहे. काही सुट द्यावी लागेल. शास्तीमध्ये सुट दिली तर एवढी रक्कम जमा होईल.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** प्रशासनाने उत्तर द्यावे अशी आमची मागणी आहे.

**मा.महापौर साहेब :-** १ कोटी १० लाख कसे होतील. नविन घरांच्या नोंदणी कशा वाढतील. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवावे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** मागच्या वेळी २५ लाख रुपये जमा झाले त्याचा खर्च कशा पध्दतीने करण्यांत आला.

**मा.उपमहापौर सौ.मालन ढोणे :-** कोरोना मुळे आपण शास्ती माफी देणार आहोत काय. काम धंदे नाही. कर्ज काढुन व्यवसाय केले आहेत. शास्ती माफी द्यावी.

**मा.आयुक्त साहेब :-** याबाबत आढावा घेतो.

**मा.महापौर साहेब :-** आयुक्त साहेब शास्ती माफी देण्यास सकारात्मक आहेत.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** वसुली होत नाही. २५ लाख जमा झाले वृक्षकर वृक्ष लागवडीसाठी वापरला जात नाही. मागील वेळी हे पैसे उद्यानासाठी वापरले जातील असे आश्वासन दिले पण तसे होत नाही. पर्यावरणा सोबत जगले पाहीजे. वृक्ष लागवड शहरात झाली पाहीजे. वृक्ष लागवडीसाठी खड्डे घेण्यासाठी मागणी केली असता माणसे नाहीत असे उत्तर मिळते. पर्यावरण संरक्षणासाठी महानगरपालिका कमी पडत आहे. मा.आदित्य ठाकरे साहेब यांनी पर्यावरण संरक्षणाची संकल्पना मुंबईत सुरु केली आहे. नगरमध्ये ओपन स्पेस मध्ये ग्रीन झोन करा. भविष्याचा विचार केला पाहीजे. वृक्षतोडीवर महानगरपालिकेचे लक्ष नाही. मागच्या वर्षी आश्वासन देवून काही झाले नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** मागच्या वर्षी २५ लाख रुपये वृक्षकर वसुल झाला. या हेडवर चर्चा चालू आहे. महासभेत अशी चर्चा झाली की वॉर्डात ५ ते १० फुटापर्यंत वृक्ष लागवड करण्यांत येईल. स्थानिक नगरसेवक यांना ट्रीगार्ड व वृक्ष उद्यान विभागा मार्फत देण्यात येईल. पण उद्यान विभागाने कार्यवाही केली नाही.

**मा.महापौर साहेब :-** मागच्या वर्षी २७ गार्डन विकसीत केले आहेत. २ कोटी रुपयांचे सीना नदी पात्रात झाडे लावली जाणार आहेत. वृक्षावरच निधी खर्च करावा. त्याच खात्यात टाकुन खर्च करावा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** वृक्षा रोपनासाठी नगरसेवकांची समिती गठीत करा. वर्षभरात कीती झाडे कोठे लावायचे, कसे लावायचे हे ते ठरवतील. ८-१० नगरसेवकांची समिती नेमा. अमृत मधुन गार्डनची देखभाल चालू आहे. वर्षभरानंतर त्यांचे काम थांबेल. त्यानंतर वाटोळे होईल. त्यांचे मेंटेंनन्स संपल्यानंतर परत रिटेंडर काढा त्यांना परत एक महिनाभर पाणी भेटते किंवा नाही. तर परत गवत उगवेल. अमृत योजनेसाठी तरतुद करा.

**मा.महापौर साहेब :-** सुचना चांगली आहे. या सुचनेचा विचार करु.

**मा.श्री.महेंद्र (भैय्या) गंधे :-** स्थायी समितीमध्ये रस्ताबाजू शुल्क वसुली निविदा कोव्हीड मुळे प्रक्रीया झाली नाही. फेरनिविदा प्रक्रीया राबवावी.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**मा.श्री.महेंद्र (भैय्या) गंधे :-** ज्या नगरसेवकांना समितीमध्ये काम करण्याची इच्छा असेल त्यांना घेण्यांत यावे.

**मा.महापौर साहेब :-** सर्व पक्षीय नगरसेवकांची समिती करु.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मागच्या वर्षी श्री.मुदस्सर शेख सभापती असतांना स्थायी समिती मध्ये वृक्ष करा संदर्भात ठराव केला वृक्ष लागवडीसाठीच निधी वापरला जाईल असा ठराव केला. त्या अनुषंगाने वृक्षकर हा वृक्ष लागवडीसाठी वापरण्यांत यावा. जे वृक्ष ऑक्सीजन देतील असे वृक्ष लावले पाहीजे. ब-याच ठिकाणी ऑक्सीजनसाठी उपयोग होत नाही. बरेचशे झाडे विषारी व प्रदुषण निर्माण करणारी आहेत. शहर हरीत होण्यासाठी शहरातील नागरीकांचे आरोग्य निरोगी राहण्यास मदत होईल. निसर्गाचा समतोल राखला पाहीजे ऑक्सीजनचे प्रमाण कमी होत आहे. जुन्या दिल्लीत झाडे कमी असल्याने प्रदुषण होत आहे. वृक्षकर फक्त वृक्ष लागवडीसाठी वापर करावा. मोठी झाडे लावावीत. फक्त सरकारी योजना राबवायची म्हणुन राबवू नये. आपत्कालीन यंत्रणे पैकी ८० टक्के मशिनरी नादुरुस्त आहे. एखादी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आपण कशा प्रकारे उपाययोजना करणार ते सांगा.

**मा.महापौर साहेब :-** वृक्षकराचे पैसे फक्त वृक्ष लागवडीसाठी वापरण्यांत यावेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणे संदर्भात बांधकाम विभागाने माहिती द्यावी.

**मा.महापौर साहेब :-** वृक्ष लागवडीचा विषय चालू आहे. बांधकाम विभागाचा विषय आल्यावर चर्चा करु.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** अग्निशमन विभाग प्रमुख आज हजर नाहीत प्रत्येक विभाग प्रमुख सभेला हजर राहीला पाहीजे. सभागृहाचा ते अवमान करतात असे माझे मत आहे. महापौर आयुक्तांनी त्यांची वाट पाहायची का. पहीले त्यांना सस्पेंड करा. महापौर प्रथम नागरीक आहेत. याचे त्यांना गांभीर्य नाही का. वर्षातली महत्वाची महासभा आज आहे. सर्व सभागृहाचा अवमान झाला आहे. कोणताही विभाग प्रमुख हजर पाहीजे. अजुनही ते आलेले नाहीत. याच ठिकाणी सस्पेंड करा. ताबडतोब त्यांची चौकशी लावा. शहरात कुठे आग लागली का, ही धर्मशाळा आहे का, पारावरची सभा लागली का. नियम जर माणसाला पाळता येत नसतील त्याच्याकडून आपल्याला उत्तराची अपेक्षा नाही. एकाला सुट दिली का काळ सोकावेल प्रत्येक विभाग प्रमुख अशीच बाजू मांडून गैरहजर राहतो.

**मा.महापौर साहेब :-** मी माहिती घेतली ते ऑनलाईन कनेक्ट होत नव्हते. आल्यावर त्यांना विचारतो.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** सगळे अशेच सांगतील त्यांचेच कसे कनेक्ट होत नाही.

**मा.महापौर साहेब :-** दोन मिनीट त्यांना बाजू मांडू द्या.

**श्री.मिसाळ,अग्निशमन विभाग प्रमुख :-** १ वाजले पासुन मी ऑनलाईन आहे.

**मा.महापौर साहेब :-** १ तास लेट आले. ३ किलो मीटर यायला पाउणतास लागतो का. पाअुलबुधे साहेबांचे म्हणणे आहे मिसाळ यांना सस्पेंड करा. माळीवाडयातुन यायला किती वेळ लागतो. कुठेजर आग लागली तर दोन तासाने येणार का.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** तुम्ही जर सस्पेंड करणार नसाल तर मी सभा त्याग करतो. पुन्हा सभेत येणार नाही. बजेटची सभा सर्वात महत्वाची सभा आहे. प्रत्येक विभाग प्रमुख सभेला उपस्थित राहणे कंम्पलसरी आहे.

**श्री.मिसाळ,अग्निशमन विभाग प्रमुख :-** १ वाजले पासुन मी ऑनलाईन आहे.

**मा.सौ.लताताई शेळके :-** हजर राहायला पाहीजे होते. महिलांना कामे असतांना मिटींगला हजर आहेत. हे का हजर नाहीत. या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

**मा.महापौर साहेब :-** तुम्ही जर ऑनलाईन नसतील तर मिसाळ वर कारवाई करा. आयुक्त साहेब यांनी कारवाई करावी. मिसाळ यांचेकडुन माहिती घेवून कार्यवाही करुन असे गणेश भोसले व अविनाश घुले यांचे म्हणणे आहे.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** त्यांच्याकडून माहिती घ्या व सस्पेंड करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आपल्याकडे आग लागल्यावर किती पंप चालू आहेत.

**श्री.मिसाळ,अग्निशमन विभाग प्रमुख :-** दोन पंप चालू आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कॉलनीत पाणी शिरले तर ते बाहेर काढण्यासाठी किती पंप आहेत.

**श्री.मिसाळ,अग्निशमन विभाग प्रमुख :-** तीन पंप आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** अग्निशमन विभागाला फोन केल्यावर पाणी उपसुन का नेत नाहीत.

**श्री.मिसाळ,अग्निशमन विभाग प्रमुख :-** जसे कॉल येतात लगेच गाडी पाठवतो. ज्या ज्या वेळेला कॉल आले त्या त्या वेळेस गाडी पाठवतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** निखील रो-हौसिंग कॉलनीत पाणी भरुन न्यावे लागणार होते. जितेंद्र सारसर यांना फोन केला. त्यांनी आपल्याकडे सक्षन पंप नाही असे सांगीतले.

**श्री.मिसाळ,अग्निशमन विभाग प्रमुख :-** माझे पर्यंत अजून कॉल आलेला नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** निखिल रो हौसिंग कॉलनीत पाणी साठले त्यावेळी माझे पी.ए.नी दोन तीन वेळा फोन केला.

**प्रभाग अधिकारी श्री.जितेंद्र सारसर :-** आपण जेंव्हा फोन केला तेंव्हा गाडी पाठवली होती.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सक्षन मशिन नाही. पाणी ओढुन नेता येत नाही. जी गाडी सक्षन करुन भरुन नेवू शकेल अशी व्यवस्था करणेसाठी गाडी विकत घेण्यासाठी मिसाळ यांना रिपोर्टींग करा. बजेटमध्ये तरतुद करा.

**प्रभाग अधिकारी श्री.जितेंद्र सारसर :-** सक्षन करायला एकही गाडी नाही.

**मा.महापौर साहेब :-** गाडी नाहीतर मागणी केली का.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** तसा अहवाल द्या या बजेट मध्ये तरतुद करा.

**प्रभाग अधिकारी श्री.जितेंद्र सारसर :-** सक्षन वाहनासाठी मागणी करतो.

**मा.महापौर साहेब :-** कुमार वाकळे यांच्या मागणी नुसार आपण एक गाडी घेवू.

**मा.सौ.सोनाली चितळे :-** आपल्या शहरात अनेक मंडळे आहेत. त्यांचे मार्फत वृक्षारोपन केले जाते. त्यांना महानगरपालिके तर्फे प्रमाणपत्र द्यावे.

**मा.महापौर साहेब :-** चांगली सूचना आहे आपण प्रमाणपत्र देवू.

**मा.श्री.विपुल शेटीया :-** कोरोना काळात समाजातील ब-याच लोकांनी काम केले. त्यांनाही धन्यवाद.

**मा.महापौर साहेब :-** त्यांचे कौतुक आपण केले पाहीजे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** वृक्षाचा विषयावर बोलतो. सारसनगर भागातील भिंगार नाला आहे. सीनानदी पात्रात ज्या पध्दतीने झाडी लावली त्याच पध्दतीने भिंगार नाला भागात लावावीत. अग्निशमन विभाग सक्षम करण्यांत यावा. प्रशिक्षीत कर्मचारी नेमण्यांत यावेत.

**मा.महापौर साहेब :-** आपल्या कल्पना चांगल्या आहेत.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** पाच नवनियुक्त सदस्यांचे सर्वांच्या वतीने स्वागत करुया. नगर शहराच्या विकासात त्यांचे चांगले योगदान राहील.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** रविंद्र बारस्कर यांनी जी सूचना मांडली त्यास मी सहमती दर्शवितो. पाच नगरसेवकांना एक हेड तयार करुन काम करावे. बुरुडगांव ग्रामपंचायतीने महानगरपालिकेस एन.ओ.सी. दिली. त्यात काही अटी शर्ती होत्या. त्यांची पुर्तता न केल्याने त्यांनी नोटीस दिली आहे. सहमती नुसार काम केले नाही तर ते एन.ओ.सी. रद्द करतील. प्रशासनाकडून कार्यवाही होणार नसेल तर प्रशासनाने या पत्राच्या अनुषंगाने उत्तर द्यावे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** पुर्ण शहराचा कचरा बुरुडगांव मध्ये नेला. कचरा गाड्या बुरुडगांव रोड वरुन जाणार या रस्त्याचे वायडींग झालेले नाही. एम्पीरियल चौका पासुन ते डेपो पर्यंत रस्ता रुंदीकरण करण्यांत यावे. पॅचिंग करुन देण्यांत यावे. जेणेकरुन तिथल्या नागरिकांना त्रास होणार नाही. दोन कचरा डेपोचा एक कचरा डेपो करायला माझा विरोध आजही आहे. बुरुडगांव ग्रामपंचायतीने महानगरपालिकेस एनओसी दिली आहे. बुरुडगांव जवळील पुल खराब झालेला आहे. पुढचा रोड खराब झालेला आहे. कमीत कमी पाच ते दहा किलोमीटर अंतर जास्त लागते. रस्ता खराब असल्याने पावसाळयात कायनेटीक चौक, व्हीआरडी कडून जावे लागते त्यामुळे डिझेल खर्च वाढतो. रस्ता करुन दिला तर हा खर्चही वाचेल.

**मा.आयुक्त साहेब :-** बुरुडगांव ग्रामपंचायतीचे तीन मुद्दे आहेत १) रस्ता दुरुस्ती, २) पाणी पुरवठा, ३) कचरा गोळा करणे. या संदर्भात बैठक घेण्यांत आली असुन बैठकीच्या अनुषंगाने लाईन टाकण्या संदर्भात एस्टीमेट करुन घ्यायला सांगीतले आहे. ग्रामपंचातीकडे पुर्वीची थकबाकी आहे असे विभागाने सांगीतले. पाणी पुरवठया संदर्भात आठवडयाला चार ट्रॅक्टर एकवेळ किंवा दोनवेळे देणे बाबत आदेश दिले आहेत. रस्त्या संदर्भात बांधकाम विभागास मुरुम टाकुन घ्यायला सांगीतले आहे.

**श्री.इथापे, प्र.शहर अभियंता :-** बुरुडगांव रस्त्याबाबत यापुर्वी जी बैठक झाली त्यामध्ये प्रमुख मागणी पावसाळी पुलाचे दुरुस्तीची होती. त्यानुसार अंदाजपत्रक तयार केले आहे. बजेट मंजूर

झाल्यानंतर काम करण्यांत येईल. रस्त्यावर मुरुम टाकण्याचे काम चाले आहे. बुरुडगांव ते डेपो पर्यंत रस्त्याचे काम मुख्यमंत्री सडक योजनेतुन प्रस्तावित आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** इतर कामाला जशी मंजूरी घेतो तशी मंजूरी घ्यायला पाहीजे. बजेट मंजूर नाही या कारणासाठी कोण विरोध करतो. उर्वरीत रस्ता १४ व्या वित्त आयोगातुन अथवा कुठल्याही निधीतुन करु अशी चर्चा बैठकीत झाली परंतु त्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही.

**मा.महापौर साहेब :-** बजेट मंजूर झाल्यानंतर काम करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** किती दिवसात काम करणार ते सांगा.

**मा.महापौर साहेब :-** ही कामे महत्वाची आहेत.

**मा.आयुक्त साहेब :-** ग्रामपंचायतीने दिलेल्या पत्राचे लेखी उत्तर देतो.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** सुविधा त्यांना देणार, त्यांना कितीही कोटीच्या सुविधा द्या तेथील नागरिकांच्या हेल्थ कंन्डीशनच्या तक्रारी कायम राहणार. प्रत्येक घरातला ५३ टक्के कचरा डेपोवर जातो. त्या कच-याची डेपोवर थप्पी होते. त्यावर प्रक्रिया केली जात नाही. त्यापासुन मिथेल गॅस तयार होतो. मिथेल गॅसचा सगळयात मोठा परिणाम आरोग्यावर होतो असे सायन्स सांगते.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** झोन वाईज कचरा डेपोसाठी जागा सुचवायला सांगीतले आहे. गाडे साहेबांच्या वॉर्डात जागा सूचवा.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** पाचगणी, इंदौर येथील डेपो ० टक्के प्रदुषण मुक्त आहेत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** झोनवाईज कचरा डेपो करीत असतांना एक त्यांच्या वॉर्डात घ्या.

**मा.महापौर साहेब :-** कच-या पासुन गॅस तयार होतो.

**डॉ.श्री.पैठणकर :-** बुरुडगांव डेपोवर कच-याचे सेग्रीगेशन होते. खतामध्ये रुपांतर होते. भाजीपाला वेस्ट पासुन गॅस तयार केला जातो.

**मा.महापौर साहेब :-** कच-यावर प्रक्रीया केली जात असल्याने रोग राई होणार नाही. २९ कोटींचा डी.पी.आर मंजूर असून कच-यापासुन कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही असे काम चालू आहे. तेही आपलेच नागरीक आहेत.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** नगर शहरातल्या रस्त्यांची अवस्था फार खराब झालेली आहे.

**मा.महापौर साहेब :-** बांधकामचा विषय येईल त्यावेळेस सांगू.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** कोरोना काळात ज्या कोरोना योध्दयांनी काम केले त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करावा. भारतीय जैन संघटना यांनी मोफत ॲन्टीजेन टेस्ट उपलब्ध करुन दिली. अमरधाम मधील मुलतानचंद बोरा ट्रस्ट यांनी विद्युत दाहीनी उपलब्ध करुन दिली. बुरुडगांवकरांनी कचरा टाकायला सहकार्य केले. अनेक त्रास सहन केला. त्यांच्या अडचणी लवकरात लवकर सोडवल्या तर त्या भागातील नागरिकांना रोगराईला सामोरे जावे लागणार नाही. लेखी स्वरुपात त्यांना माहिती द्यावी.

**मा.श्री.मदन आढाव :-** कचरा संकलन करणा-या आपल्याकडे किती गाड्या आहेत. कचरा वाहतुकीत वजन वाढवुन मोठा घोटाळा झाला आहे. आपला एक कर्मचारी १०० टक्के वजन करुन घेतो का ? का काटामारी केली जाते .

**मा.महापौर साहेब :-** तुम्हाला लेखी उत्तर देण्यांत येईल पैठणकरांनी माहिती द्यावी.

**डॉ.श्री.पैठणकर :-** १५० मेट्रीक टन बुरुडगावला कचरा जमा होतो. ८ कॉम्पॅक्टर १६० घंटागाडया आहेत. यश पॅलेस समोर वजन काटयावर वजन केले जाते. दररोज डेपोवर केअर टेकर मार्फत पावत्या जमा केल्या जातात.

**मा.श्री.मदन आढाव :-** व्हीडीओ शुटींग संदर्भात काय करता येईल ते पहा.

**मा.श्री.अविनाश घुले :-** डंपींग गाड्या ज्या घेतल्या त्या डंपिंग होत नव्हत्या त्या गाड्यांची आजची काय अवस्था आहे. गाड्या घेतांना टेस्ट करुन घेतल्या नव्हत्या का. एका वेळेला २५ गाड्या बंद कशा पडू शकतात.

**डॉ.श्री.पैठणकर :-** ज्या कंपनीकडून गाड्या घेतल्या ती वर्षभर सेवा देणार आहे.

**मा.महापौर साहेब :-** १ वर्ष देणार का तीन वर्ष.

**डॉ.श्री.पैठणकर :-** १ वर्ष फ्री मेंटेनन्स करुन देणार आहेत.

**मा.महापौर साहेब :-** त्यांना नोटीस द्या एवढया गाडया एकाच वेळी डंपींग होत नाहीत.

**डॉ.श्री.पैठणकर :-** २० गाड्या दुरुस्तीलापाठवल्या आहेत. त्या आल्या की ताफ्यात दाखल होतील.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** आम्हाला पाच नगरसेवकांना विशेष निधी द्यावा. आम्ही खरेच चांगले काम करुन दाखवू. एकवीरा चौक ते तपोवन रोड खराब झालेला आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** कोरोना काळात सफाई कामगारांसाठी महानगरपालिके तर्फे कोणत्या सुविधा पुरविल्या जातात. हॅण्डग्लोज मास्क देतो का.

**डॉ.श्री.पैठणकर :-** कामगारांना मास्क सॅनिटायझर दिलेले आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** कर्मचारी वापरतांना दिसत नाहीत. वापरण्या बाबत तयांना सांगीतले पाहीजे. पुर्ण सुविधा दिल्या पाहीजेत.

**डॉ.श्री.पैठणकर :-** आपण त्यांना सूचना देवू व वापरणे बाबत दक्षता घेण्यांत येईल.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** घनकचरा बिलाची चौकशी झाली, चौकशी बाबत माहिती देण्यांत यावी.

**मा.आयुक्त साहेब :-** मुख्यलेखापरीक्षक यांच्याकडे चौकशीचे कामकाज दिले होते. त्यांनी चौकशी केली नाही. ते सेवानिवृत्त झाले असल्याने आता सहाय्यक आयुक्त सिनारे यांच्याकडे चौकशीचे कामकाज सोपविले आहे. बीले अद्याप अदा केलेली नाहीत.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** चौकशीला उशीर का होतो.

**मा.आयुक्त साहेब :-** मुख्यलेखापरीक्षक श्री.खरात यांनी चौकशीचे कामकाज केले नाही म्हणुन त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली आहे. ठेकेदार यांनी बीला बाबत मागणी केल्याने सहाय्यक आयुक्त यांची चौकशीच्या कामी नेमणूक केली आहे. जोपर्यंत बिलाची छाननी होत नाही. तोपर्यंत बील अदा करण्यांत येणार नाही.

**मा.सौ.लताताई शेळके :-** महिला बालकल्याण समितीचे सन २०१९-२०२० मध्ये १५ टक्के बजेट मंजूर केले होते. आता २०२०-२०२१ मध्ये ० टक्के का केले.

**मुख्यलेखाधिकारी :-** तो विषय आल्यावर बोलू.

**मा.सो.दिपाली बारस्कर :-** कच-याच्या ज्या नविन गाडया घेतल्या त्या कचरा डेपोवर डंप होत नाही. त्यामुळे वॉर्डात कचरा संकलन होत नाही. स्वच्छ सर्व्हेक्षण अभियान नंतर महानगरपालिकेचे कच-याकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांची झाली आहे.

**मा.महापौर साहेब :-** आपण नोटीस काढायला सांगीतली आहे. त्याची एक प्रत आपल्याला व अविनाश घुले यांना देण्यांत येईल.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** रस्त्यावरच्या कचरा कुंडया उचलल्या. पण रस्त्यावर कचरा पडलेला असतो. तो उचलून नेला जात नाही.

**मा.महापौर साहेब :-** पैठणकर या संदर्भात कारवाई करा.

**डॉ.श्री.पैठणकर :-** आपण जो ठेका दिला आहे त्यामध्ये संपुर्ण शहरातील कचरा उचलणे ठेकेदारास बंधनकारक आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** संपूर्ण कचरा उचलला जातो का.

**डॉ.श्री.पैठणकर :-** मा.महापौर यांच्याकडे चार दिवसापुर्वी बैठक झाली असुन एक ग्रुप तयार केला आहे. वाहनाच्या खेपा वाढविण्याच्या सूचना आपण दिल्या आहेत. कचरा वाहन नादुरुस्त असणे अभिप्रेत नाही.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** झाडाच्या तोडलेल्या फांद्या,  पाला पाचोळा, गवत या कच-यामध्ये येत नाहीत का.

**डॉ.श्री.पैठणकर :-** कच-याचाच भाग आहे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** स्वयंभू ट्रान्सपोर्टचे लोक सांगतात पैठणकर साहेबांनी सांगीतले तो कचरा उचलू नका.

**डॉ.श्री.पैठणकर :-** तो कचरा वेगळा उचलावा लागेल. स्वतंत्र ठिकाणी साठवावयाचा आहे. एकत्र कच-यात तो उचलला तर मशिनमध्ये कचरा,गवत अडकतो. त्यामुळे मशिन बंद पडू शकते.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** ठेकेदार यांना कचरा उचलायला सांगा.

**डॉ.श्री.पैठणकर :-** एक लेखी आदेश पारीत करतो त्याची एक प्रत तुम्हाला देतो.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** अमृत योजने अंतर्गत कॉटेज कॉर्नर येथे उद्यान विकसीत केले तेथील गवत वाढले आहे. झाडे जळून गेली आहेत. मेटेंन करायला कोणी येत नाही. नियंत्रित करणारी कोणती यंत्रणा आहे का. आयुक्तांनी सर्व उद्याने पाहीली पाहीजेत.

**मा.महापौर साहेब :-** आयुक्त व मी भेट देवू. लाईटच्या विषयावर चर्चा करु.

**मा.श्री.महेंद्र (भैय्या) गंधे :-** नगर शहरात गेल्या दोन तीन वर्षापासुन नगरसेवकांची मागणी आहे लाईट द्या निविदा मागविण्याचे ठरले त्या संदर्भात माहिती द्या.

**मा.महापोर साहेब :-** आजच प्रीबीड मिटींग झाली पाच कंपन्यांनी भाग घेतला आहे. निवीदा मंजूर झाल्यानंतर अडचणी दूर होतील.

**श्री.मेहेत्रे, प्रकल्प अभियंता :-** अहमदनगर महानगरपालिकेकडून संपूर्ण शहरासाठी स्मार्ट ई - निविदा मागविली आहे.   ३६ हजार फिचर्स आहेत. त्यामध्ये सोडीयम एलईडी आहेत. जुन्या सगळया फिचर्स काढण्यांत येणार असुन एजन्सी मार्फत नविन फिटींगा बसविण्यांत येणार आहेत. मेंटेनन्स ते करणार आहेत. महानगरपालिका एमएससीबीला जे ३८ लाख रुपये बील देतो तेवढी रक्कम ठेकेदाराला द्यावयाची आहे. महानगरपालिकेच्या जुन्या फिटींग परत द्यायच्या आहेत. कंम्लेंट आल्यानंतर ४८

तासात रिपेअर करुन, रिप्लेस करुन त्याने द्यायची प्रणाली डेव्हलप करीत आहोत. त्यांचे मदतीला आपला स्टाफ सुध्दा असणार आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** ज्या ठिकाणची लाईट गेली त्या ठिकाणची कंम्पेंट मोबाईल ॲपव्दारे पाठविता येईल असे ॲप डेव्हलप करा.

**मा.श्री.महेंद्र (भैय्या) गंधे :-** लाईट कशा बसविणार.

**श्री.मेहेत्रे, प्रकल्प अभियंता :-** रोडच्या वीडथ हाईट नुसार ५० ते १८० वॅट पर्यंत लाईट बसविणार आहेत. आहे ते ट्रक्चर तसेच ठेवणार.

**मा.श्री.अविनाश घुले :-** नगरसेवकाने जर मागणी केली तर त्या पुरवणार का.

**मा.श्री.महेंद्र (भैय्या) गंधे :-** आपण ज्या फिटींगा त्यांना देणार त्या परत बसवणार का.

**मा.महापौर साहेब :-** जुन्या फिटींगचे पैसे ठेकेदार एजन्सी आपल्याला देणार.

**श्री.मेहेत्रे, प्रकल्प अभियंता :-** चार महिन्यांचा कालावधी दिला आहे.

**मा.श्री.महेंद्र (भैय्या) गंधे :-** महापौर यांनी चांगला निर्णय घेतला आहे. उत्तरोत्तर असेच चांगले निर्णय त्यांच्या काळात घेतले जातील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** मा.आमदार संग्रामभैय्या जगताप व आपल्या प्रयत्नातुन हा प्रश्न मार्गी लावत आहात त्याबद्दल अभिनंदन शहरात उपनगरात नविन पोल बसविण्याची प्रोव्हीजन टेंडर मध्ये घेण्यांत यावी.

**श्री.मेहेत्रे, प्रकल्प अभियंता :-** नविन पोल महानगरपालिकेला बसवावा लागेल.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** माझ्या प्रभागात वारंटी पिरीयड मधील ठेकेदाराने लावलेल्या एलईडी फीटींग काढुन घेतल्या.

**मा.महापौर साहेब :-** मेहेत्रे यांनी याबाबत चौकशी करावी तुम्हाला सर्व माहिती दिली जाईल. उद्याच्या उद्या श्री.मेहेत्रे यांनी माहिती द्यावी.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** लाईटचा हा प्रश्न मार्गी लागला तर नागरिकांच्या अडचणी दूर होतील, नगरसेवकांचे काम झालेले दिसेल. देवी रोडच्या दोन्ही बाजुंची लाईट बंद आहे. ज्या ठिकाणी लाईट बंद आहे. त्याठिकाणी हॅलोजन लावले तर पायी येणा-या नागरिकांना त्रास होणार नाही.

**श्री.मेहेत्रे, प्रकल्प अभियंता :-** उद्याच्या उद्या करुन देतो.

**मा.श्री.अविनाश घुले :-** श्री.मुनोत माझ्या वॉर्डातील नागरीक आहेत. घरपट्टी भरण्यासाठी ते महानगरपालिकेत आले होते. त्यांच्याकडून पैसे भरुन घेतले नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** श्री.मेहेत्रे यांनी पदभार स्विकारल्या नंतर कामकाजात फरक पडला आहे. जे एल.ई.डी.बसविणा-या संस्थेला आपण काम देवू शहरामधील प्रमुख चौक आहे. त्या चौकात ठेकेदार यांच्याकडून हायमास्ट दिवे बसवुन घेण्यांत यावेत. त्यांच्याकडे फक्त फिक्चरची जबाबदारी आहे. पोलची जबाबदारी आपली आहे. सद्यस्थितीत ज्या ठिकाणी पोल नाही. त्या ठिकाणी इमारतीवर तो बसविणार आहे.

**मा.सौ.आशाताई कराळे :-** आपण जे निर्णय घेतले ते चांगले आहेत. असेच निर्णय घ्यावेत.

**मा.श्री.विपुल शेटीया :-** अतिशय चांगला निर्णय घेतल्याबद्दल धन्यवाद. नगरोत्थान योजने अंतर्गत केडगांव रस्ता, बालिकाश्रम रस्ता असेल त्या रस्त्याचे मेंटेंनन्स होत नाही. ज्या संस्थेला आपण काम देणार त्यांचेकडून मेटेंनन्सची जबाबदारी घेण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** आपल्या विनंतीचा विचार करु.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढेल यासाठी एक सभा घेण्यांत यावी. २१५ कोटी वसुली आहे. कडक कारवाई केली तर वसुल होईल. चांगल्या प्रकारे हातभार लागेल.

**मा.महापौर साहेब :-** लाईटवर कोणाला बोलायचे आहे का ? पाणी पुरवठयावर कोणाला बोलायचे आहे का ?

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** फेज - २ केंव्हा पुर्ण होणार ?अधिका-यांकडे नैतिकता आहे की नाही. दंडात्मक कारवाई केली म्हणजे जबाबदारी संपली का? १० वर्षे झाली या योजनेचे काम सुरु होवून केंव्हा पूर्ण होणार ?

**मा.श्री.मनोज कोतकर :-** मुळा योजनेकडून जे काम चालू आहे. अधिका-यांच्या हिशोबाने ते अंतिम टप्प्यात आहे.

**श्री.निकम, मेकॅनिकल इंजिनियर :-** पाणीपुरवठा योजना फेज-२ ची कामे होती. ७ सबवर्क पैकी ५ पुर्ण झाली. पाणीपुरवठा सुरु केला. वितरण व्यवस्था ९५ ते ९६ टक्के पुर्ण झाली. ५ ते ६ कि.मी. एच.डी.पी.ई. चे काम राहीले आहे. पाणीपुरवठा चालू केला आहे. ७ ते ८ महिने काम बंद होते. १० दिवसांपुर्वी काम सुरु केले १ ते दीड महिन्यात काम पुर्ण होवुन ही योजना पुर्ण होईल. ९५ ते ९६ टक्के काम पूर्ण झाले आहे. तीन टाक्या भरल्या जातात.

**मा.महापौर साहेब :-** काम लवकरात लवकर चालू करा.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** विळद पर्यंत काम आलेले आहे. २० टक्के शिल्लक आहे. विळद पासुन पुढचे पंचनामे आले नाहीत. अडीच ते तीन वर्ष झाले.

**मा.महापौर साहेब :-** पंचनामे पुर्ण होणार नाहीत. ही योजना वनविभागाकडून होणार आहे. वनविभागाकडून परवानगी मिळणार आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** लवकरात लवकर वनविभागाकडे पाठपुरावा केल्यानंतर योजना मार्गी लागेल. वॉर्ड क्रमांक १७ या ठिकाणी काही भागामध्ये पाण्याच्या टाकीच्या लेव्हल मध्ये फरक पडतो. पाणीपुरवठा कमी होतो. टँकर १० -१२ दिवस जात नाही. वॉर्ड क्रमांक १७ मध्ये कांबळे वस्ती येथे पाण्याची अंडरग्राउंड टाकीचा विषय बजेटमध्ये घ्यावा. बिरोबा मंदिर लगतचा रोड, कायनेटीक चौक, रबिश कॉलनी, आव्हाड वीटभट्टी परिसरामध्ये टाकीची आवश्यकता आहे. तीनही ठिकाणी टाकीचे बांधकाम लवकरात लवकर करावे.

**मा.सौ.सोनाली चितळे :-** मध्य शहरात श्री.आफाक फिटर यांचेकडे किमान ५ कर्मचारी फॉल्ट काढण्यासाठी मानधनावर घेण्यांत यावेत.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे. लहारे यांना सांगू.

**मा.श्री.अविनाश घुले :-** आशिर्वाद कॉलनी येथे वॉल बसवुन झाले. एण्ड कॅप बसवायचे पार्वती संस्थेचे लोक कामावर नाहीत. महिना दोन महिने झाले.

**श्री.सातपुते,पाणीपुरवठा विभाग प्रमुख :-** ६ ते ७ महिने काम बंद होते. १० दिवसापासुन काम चालू केले आहे. महापौर साहेबांकडे मागील मिटींग झाली त्यामध्ये दोन ते तीन दिवसात काम सुरु होईल असे सांगीतले होते.

**मा.श्री.अविनाश घुले :-** प्रत्येक वॉर्डात घाण पाणी काढण्यासाठी दोन माणसे आहेत. दुरुस्तीसाठी ८ ते १० दिवस थांबावे लागते. स्टॅण्डींग मध्ये हा विषय घेण्यांत यावा. अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे. आम्ही स्वत: खर्च करतो.

**श्री.सातपुते,पाणीपुरवठा विभाग प्रमुख :-** कर्मचारी वर्ग अत्यंत अपुरा आहे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** वॉलमन फक्त वॉल सोडायचे काम करतात व्यवस्थीत बोलत नाहीत.

**श्री.सातपुते,पाणीपुरवठा विभाग प्रमुख :-** प्रत्येक वॉलमन कडे ५० ते ६० वॉल येतात टायमिंग कव्हर होत नाही.

**मा.महापौर साहेब :-** लोकांना व्यवस्थीत उत्तरे द्यायला वॉलमनला सांगा.

**श्री.सातपुते,पाणीपुरवठा विभाग प्रमुख :-** दिनांक २२ रोजी सर्व वॉलमनची मिटींग लावलेली आहे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** माणसे कधी उपलब्ध करुन देणार. संपुर्ण शहराचा हा विषय आहे.

**मा.महापौर साहेब :-** एक अंडरग्राउंड कांबळे मळा बायपास, बिरोबा मंदिर, कायनेटीक चौक या ठिकाणी तीन टाक्यांची आवश्यकता आहे.

**श्री.निकम, मेकॅनिकल इंजिनियर :-** या बजेट मध्ये तरतुद करु.

**मा.उपमहापौर सौ.मालनताई ढोणे :-** फेज-२ चे काम कधी पुर्ण होईल.

**श्री.निकम, मेकॅनिकल इंजिनियर :-** महिना दीड महिन्याच्या कालावधीत काम पुर्ण होईल. पाईप लाईनच्या योजनेतुन पंप चालू आहेत. त्या योजनेतुन शहरात फेज -२ योजनेतुन पाणी येते. वॉलमन यांची बैठक घेवून त्यांना सूचना देवू.

**मा.उपमहापौर सौ.मालनताई ढोणे :-** धरणे भरली तरी दिवसा आड पाणी पुरवठा होतो.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** सारसनगरच्या टाकी मध्ये पाणी येत नाही. त्या ठिकाणी एक संपवेल बांधावा व या बजेटमध्ये तरतुद करण्यांत यावी. टाकीच्या दुरुस्तीची तरतुद बजेटमध्ये करावी. समर्थनगर येथील टाकीसाठी तरतुद करावी. लाखो रुपये पाण्यात जाणार आहेत.

**श्री.सातपुते,पाणीपुरवठा विभाग प्रमुख :-**संपवेलची तरतुद करु नविन टाकीची आवश्यकता भासणार नाही.

**मा.श्री.गणेश भोसले :-** प्रभागातील सिस्टीम सांगा. १७ प्रभागात कसे लोक काम करतात.

**श्री.निकम, मेकॅनिकल इंजिनियर :-** झोन ऑफिस, प्रत्येक झोन मध्ये एक इंजिनियर आहे. काही झोनच्या ऐवजी टाकीच्या अंडर जी पाईपलाईन व्यवस्था आहे. त्यावर एक हेडवॉलमन त्यांच्या हाताखाली वॉलमन पाणी वितरणाची व्यवस्था आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** फिटरच्या वर कोण पाहीजे. सुपरवायझर असायला पाहीजे.

**श्री.निकम, मेकॅनिकल इंजिनियर :-** आकृती बंधात सर्व सिस्टीम आहे. त्याप्रमाणे कार्यरत कर्मचारी /लोक नाहीत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** चार वॉर्डच्या अनुषंगाने किती पाहीजेत व आत्ता कीती आहेत. १ लेबर आहे. एक इंजिनियर आहे. सुपरवायझर नाहीत. २० हजार ते २५ हजारच्या प्रभागात एक फिटर एक लेबर कसे काम करणे शक्य आहे. तक्रारी कशा हँडल करायच्या.

**श्री.निकम, मेकॅनिकल इंजिनियर :-** चार झोन चार इंजिनियर, इंजिनियरच्या हाताखाली झोन १ ते ४ एरिया मोठा आहे. दोन ते तीन सुपरवायझर, फिटर, हेडफिटर, प्रत्येक फिटरला ८ बिगारी पाहीजेत. वॉलमनच्या हाताखाली मदतनीस पाहीजेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** माझ्या वॉर्डात १५ दिवस झाले तक्रारी दूर झाल्या नाहीत. साधा लेबर फिटर, इंजिनियर वॉर्डात येवू शकत नाहीत. एवढे मोठे ७१५ कोटींचे बजेट मांडतो. कोणत्या दिशेने वाटचाल सुरु आहे. रुटीनच्या पाण्याचा विषय आहे.

**श्री.निकम, मेकॅनिकल इंजिनियर :-** कर्मचारी मिळणे बाबत वेळोवेळी मागणी केली आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** नगर शहराची हद्दवाढ झाली. लोकसंख्या वाढली. कर्मचारी संख्या कमी झाली म्हणजे उलटा प्रवास सुरु झाला म्हणावा लागेल.

**मा.श्री.अविनाश घुले :-** वॉलमन मोबाईल स्वीच ऑफ करुन ठेवतात मग नागरिकांचे फोन आम्हाला येतात.

**मा.महापोर साहेब :-** ते नीट वागत नसतील तर त्यांना घरी पाठवा.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** कमीत कमी वॉलमनशी बोलणे झाले तर आम्ही नागरिकांना सांगू शकतो. नागरिकांना आम्ही महानगरपालिके पर्यंत येवू देत नाही आम्ही त्या लोकांचे समाधान करतो.

**मा.महापौर साहेब :-** जे मोबाईल बंद ठेवतील त्यांचेवर कारवाई करा.

**मा.श्री.अविनाश घुले :-** दुरुस्तीसाठी माणसे कधी देणार.

**मा.श्री.गणेश भोसले :-** पाणी पुरवठा ठेक्याने देवून टाका.

**मा.महापौर साहेब :-** माणसे द्या व जे कोणी फोन बंद ठेवतील त्यांचेवर कारवाई करा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** बांधकाम विभागात किती बिगारी आहेत. बिडवे सांगतो दोनच बिगारी आहेत.

**मा.महापौर साहेब :-** ४० ते ४४ बिगारी आहेत.

**श्री.इथापे, प्र.शहर अभियंता :-** आत्ता बिडवे मुकादम कडील कर्मचारी घरोघरी सर्व्हेसाठी गेल्यामुळे तीन लोक आहेत. ६ ते ७ प्रॉपर्टी वॉचमन म्हणुन लावले आहेत. अमरधाम आंबेडकर स्मारक याठिकाणी वॉचमन आहेत.

**मा.श्री.अविनाश घुले :-** हा वॉलमनचा विषय नाही. सेवानिवृत्त लोकांच्या जागी लोक मिळत नाहीत. वर्षानुवर्ष बिगारी मिळत नाहीत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** बिगा-यांना वॉचमनचे काम देण्याची आवश्यकता नाही. महापौर बांधकामा संदर्भात चर्चा घ्या.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** पॅचींगला प्रत्येकवेळेस उशीर होतो. गणपती, मोहरम मिरवणुका कोरोनामुळे काढण्यांत आलेल्या नाहीत. आता केलेले पॅचींग टिकणार नाही. ७ -८ दिवस पाउस चालू आहे. मुरुम टाकतात तो टिकत नाही. जनतेचा पैसा वाया जातो. वेळेत पॅचींग झाले तर या समस्या येणार नाहीत. शहरात सगळीकडे खड्डे झालेले आहेत.

**श्री.इथापे, प्र.शहर अभियंता :-** यापुर्वी लॉकडाउन असतांना ५ ते ६ रस्त्यांचे पॅचींग केले आम्ही त्याचे नियोजन मार्च २०२० मध्ये केले. परंतु दुर्दैवाने तीन वेळा टेंडर कॉल करुन प्रतिसाद मिळाला नाही. मध्यंतरी पाठपुरवा करुन ४ टेंडर ४ प्रभागासाठी प्रसिध्द केले. शहरात पॅचींगचे काम उन

पडते तेंव्हा चालू केले. लक्ष्मीबाई कारंजा परिसरात पावसामुळे काम थांबले. आणखी ३ टेंडर प्रसिध्द झाले. युध्दपातळीवर प्रमुख रस्त्यातील पॅचींगचे काम हाती घेवू. पावसाचा व्यत्यय आला नाही तर एक महिन्यात पॅचींग काम पुर्ण होईल.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** राउटींग व्यवस्थीत केले जात नाही. पॅचींग व्यवस्थीत करुन घ्यावे. महिलांच्या गाड्या स्लीप होतात. प्रशासनाने त्यावर लक्ष देवून काम व्यवस्थीत करुन घ्यावे.

**मा.सौ.सुवर्णा गेनाप्पा :-** तख्तीदरवाजा ते जुन महानगरपालिका या रस्त्याचा निधी मंजूर आहे. पण अजुन कामाला सुरुवात नाही.

**श्री.इथापे, प्र.शहर अभियंता :-** वर्क ऑर्डर दिली आहे. निधीपण आहे. शहरात अमृत भुयारी गटर योजनेचे काम वाडीयापार्क पासुन जुन्या महानगरपालिका पर्यंत पुर्ण झाले आहे. भुयारी गटर योजनेचे काम झाले की, तो रस्ता करता येईल. पाणीपुरवठा योजनेचे काम लवकरात लवकर झ ाले की रस्त्याचे काम सुरु करु.

**मा.सौ.सुवर्णा गेनाप्पा :-** नेहरुमार्केट पाडुन बरेच दिवस झाले.

**श्री.इथापे, प्र.शहर अभियंता :-** बी.ओ.टी. एफ.बी.टी. तत्वावर प्रयत्न झाले परंतु प्रतिसाद मिळाला नाही. लवकरच महासभेपुढे प्रस्ताव सादर करु.

**मा.सौ.संध्या पवार :-** उपनगरातील रस्ते खड्ड्याने भरले आहेत. बजेटमध्ये या रस्त्यालाही तरतुद करावी. एकवीरा चौक ते तपोवन रस्ता फार खराब झालेला आहे. दुरुस्ती करावी.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** सावेडी उपनगरासाठी काय नियोजन आहे.

**श्री.इथापे, प्र.शहर अभियंता :-** वॉर्ड क्रमांक १ ते ४, ५ ते ८, ९ ते १२, १४ ते १७ या साठी वेगवेगळे टेंडर काढले. टेंडर प्रक्रीया अंतिम टप्प्यात आहे. येत्या आठ दिवसात काम सुरु होईल. सुरुवातीस प्रमुख वाहतुक असणारे रस्ते, जास्त खड्डे असणारे रस्ते, इतर रस्ते घेण्यांत येतील.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** भिस्तबाग चौक ते महाल रस्त्याचे काम थांबले आहे. या कामाला गती का देत नाही.

**श्री.इथापे, प्र.शहर अभियंता :-** व्याजाच्या पैशातुन ते काम करीत आहे. पाईप लाईनला अतिक्रमण, झाडे आहेत. त्यामुळे विलंब लागत आहे. झाडे सरसकट न तोडता ३२ झाडे काढण्यास मंजूरी दिली. पाईप लाईन परिसरातील काही कामाचे एस्टीमेट पाईपलाईन शिफटींगसाठी १४ लाखाचे एस्टीमेट केले. ज्या ठिकाणी काम करायला स्कोप आहे तेथे काम सुरु केले. पुढचे काम लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** प्रोफेसर कॉलनी ते भिस्तबाग चौक १४ लाखाचे एस्टिमेंट केले. लाईन शिप्टींगसाठी निधीला पण - - -

**श्री.इथापे, प्र.शहर अभियंता :-** निधी अपुरा उपलब्ध असतो. तेवढया रकमेत जेवढे काम करणे शक्य होते . जास्त लांबीचा व्हावा असा हेतू होता.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** नंतर ड्रेनेज लाईन टाकून नंतर पाईप लाईन शिप्टींग केले तर तो रस्ता कसा टिकेल. रस्ता १० कि.मी .करण्यापेक्षा ५ कि.मी.करा

**श्री.इथापे, प्र.शहर अभियंता :-**रस्ता परत फोडण्याची वेळ येवू नये यादृष्टिने काम सुरू आहे.

**श्री.सातपुते,पाणीपुरवठा विभाग प्रमुख :-** प्रोफेसर कॉलनी ते भिस्तबाग चौक पाईप लाईन शिफ्टींग करणे भिस्तबाग ते महालापर्यंत ३१ लाख बजेटमध्ये तरतूद करून टेंडर प्रसिध्द करून निधी उपलब्ध झाली तर ताबडतोब टेंडर प्रसिध्द करू

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आम्हाला सांगा या योजनेत पाईप लाईन -- -

**मा.आयुक्त साहेब :-** नियमावली तोडता येणार नाही. २५ लाखातील कामे करता येईल. एस्टिमेंट ३१ लाखाचे आहे. बजेट डायव्हर करता येईल. बोर्डाकडेच यायला पाहिजे. ३३ लाखाची फोड करता येणार नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** येथे १०० फाईल आहेत कामाचे तुकडे केलेले आहेत. इंजिनिअर यांनी सांगावे भिस्तबाग ते महालापर्यंत व डॉक्टर कॉलनी ते भिस्तबाग ८ लाखाचे दोन तुकडे केले आहेत.

**मा.आयुक्त साहेब :-** एस्टिमेंट तयार आहे. बजेट मंजूरी मिळाली की, फंड दोन्ही प्रोसेज चालू करावयास सांगितले. मंजूरी होईपर्यत थांबलेली नाही. वर्क ऑर्डर देण्याच्या अगोदर सर्व प्रोसेस करून कारवाई पूर्ण करून बजेट मंजूर झाल्याशिवाय मार्ग काढा दोन वेळेस घेण्यापेक्षा एकदाच मंजूरी घ्या. कायदयाच्या प्रोव्हिजन - - -करण्यापेक्षा दोन्ही कामे एकाच वेळी करता येईल

**मा.श्री.संपत बारस्कर:-** किती दिवसात वर्क ऑर्डर देणार. एक महिन्यात होईल का

**मा.सौ.सोनालीताई चितळे -** नेहरू मार्केटसाठी मोठी तरतूद करून मनपाने स्वतः उभारावे.

**मा.महापौर साहेब -** ठिक आहे.

**मा.श्री.अविनाश घुले -** प्र.क्र. ११ मध्ये कोंबडीवाला मळा डीपी रोड आहे. तेथील पूल वाहून गेला तो रस्ता अत्यंत दुर्दशा झाली आहे. कोठेही डांबर राहिला नाही. नागरिकांची गैरसोय होत आहे. पुल वाहून गेला आहे. मी निवेदन पण देतो. फोटो सुध्दा काढून आणलेला आहे. वाकोडी भागातून लोक मार्केट मध्ये येतात. या बजेटमध्ये पुलासाठी व रस्त्याची कॉक्रीटीकरणाची तरतूद करावी या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा.

**मा.श्री.महेंद्र (भैय्या) गंधे :-** फेज-२ व रस्त्याच्या कामास - - -

**मा.सौ.लताबाई शेळके :-** २०१९-२०२० मध्ये बजेटमध्ये १५ लाख तरतूद होती. आता ० तरतूद का दाखविली.

**मुख्यलेखाअधिकारी -** ही तरतूद मा.महासभेमध्ये करतात. प्रशासन करित नाही.

**मा.महापौर साहेब :-** मागच्या वेळी १५ लाख होते आता किती घेणार २५ लाख देतो

**मा.उपमहापौर सौ.मालन ढोणे :-** भुयार गटर योजनेचे काम किती झाले मुदत केव्हा संपली.

**श्री.सातपुते,पाणीपुरवठा विभाग प्रमुख :-** २६ टक्के काम झाले. ३ महिने झाले मुदत संपून एमजीपी कडे प्रस्ताव सादर केला आहे. एमजीपी कडून अहवाल आला. एमजीपीने मार्च पर्यत काम संपवण्याचे निर्देश दिले.

**मा.उपमहापौर सौ.मालन ढोणे :-** कारवाई ची जबाबदारी कोणाची निश्चि केली. नोटीस पीएमसी कडे दिली नाही. ठेकेदार रस्त्याचे काम करून देतो. कुठलेच रस्ते

**श्री.सातपुते,पाणीपुरवठा विभाग प्रमुख :-** बांधकाम विभाग व एमजीपीचे कोठी रोड, निळकंठ सोसायटी रामवाडीतील रस्ता केला.

**मा.उपमहापौर सौ.मालन ढोणे :-** बागडपट्टी येथील भुयारी गटरचे काम झाले रस्ता पॅचिंग करणे संदर्भात किती पत्र दिले. आठ दिवसात काम करून दयावयास सांगा. ठेकेदार अटी शर्तीचे उल्लंघन करित असल्यास दंडात्मक कारवाई करावी. प्रशासनाने वेळोवेळी भेटी देवून पाहणी करावी. अन्यथा न्यायालयात जावून दाद मागावी लागेल.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** उपनगरात लोकसंख्या वाढलेली आहे. हॉस्पीटलचे नियोजन करावे अशी मागणी करतो.

**मा.महापौर साहेब**:- ठिक आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** भुयारी गटर योजनेची मुदत संपली तरी २६ टक्के काम झाले आहे. याच कामाला लवकरात लवकर दोन्ही योजनेसाठी प्रशासनाने पाठपुरावा करावा. व लवकरात लवकर वर्क ऑर्डर कशी देता येईल. सावेडी व केडगांव भागात काम कसे लवकर करता येइर्ल.

**मा.महापौर साहेब :-** मा.केंद्र शासनाची मंजूरी लागेल. ३० टक्के काम झालेली मंजूरी मिळेल.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** १४ वित्त आयोगात घनकच-यासाठी किती तरतूद आहे.

**डॉ.श्री.पैठणकर :-** निधी सर्व मुलभूत अनुदान आहे. ५० मेट्रीक टन प्लॅट उभारवयाचा आहे.

**मा.महापौर साहेब :-** निधी किती लाख आहे ते सांगा

**डॉ.श्री.पैठणकर :-** निधी ३९.५० हजार प्राप्त झालेला आहे. कचरा संकलन ,वाहतूक व कचरा प्रक्रियेसाठी वापरावयाचा आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** सारसनगर पुलाची कठडे तुटल्यामुळे एकजण नाल्यात पडला ही बाब इंजिनिअर निंबाळकर यांना सांगितली कुठलीही घटना येथे अपघात होवून जिवीत हानी होण्याची शक्यता आहे. पुलाच्या दुरूस्ती व सुशोभिकरणासाठी निधीची तरतूद या ठिकाणी करावी अशी विनंती करतो. जेणे करून भविष्यात कोणतीही जिवीत हानी यापुढे या ठिकाणी होणार नाही.

**मा.सौ.लताबाई शेळके :-** कै.बा.दे.दवा.साठी २५ स्टाफ असताना स्टाफ कमी आहे.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** NUHM ५-६ सिस्टर दिल्या आहे. सेवा निवृत्त झालेल्या स्टाफमुळे स्टाफ कमी आहे.

**मा.महापौर साहेब** - आशा वर्करला मुदतवाढ देत नाही. त्यांचे मानधन देत नाही. आशा किती नर्स आहेत त्यांना आपण कित्येक महिना पगार दिला नाही.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** त्यांचे नेमणुक कन्टयुनेशन आहे प्रस्ताव आस्थापना विभागाकडे दिला आहे.

**मा.महापौर साहेब :-** आपल्याकडे प्रस्ताव प्रलंबित आहे.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** आस्थापना विभागाने परत फाईल माझ्याकडे पाठविली. आपल्याला - - - - त्यांना इतर विभागात दयावे लागेल.

**मा.महापौर साहेब** - त्याचे पगार थांबवतो याबाबत ब-याच लोकांच्या तक्रारी आहेत.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** NUHM निधी आहे. त्याचे नियमीत पगार होतात. आशा गट प्रवर्तकामार्फत मुल्यमापन करून पगार अदा करण्यात येतो**.**

**मा.महापौर साहेब :-** कोणाचेही पगार थांबवू नका तुमच्याकडे फाईल आल्यावर थांबवू नका. रक्तपेढीचा नर्सचा स्टाफ बीडीसीडीकडे दया.

**मा.सौ.सुवर्णा गेनाप्पा :-** बेबी सिस्टर ५०-६० नेमवावे लागतील वसुली विभागाचे कामही ठप्प आहे. ऑन लाईन साईटमध्ये ब-याच त्रुटी आहेत. प्रत्येक नागरिकाला मोबाईल नंबर मध्ये जावून तो नंबर अपलोड केला तर मेसेज पाठविता येईल.

**मा.महापौर साहेब :-** व्यवस्था लवकरात लवकर करू श्री. झीने यांनी पहावे.

**मा.सौ.सुवर्णा गेनाप्पा :-** सानुग्रह अनुदानाची काय तरतूद आहे दिवाळीसाठी. तरतूद वाढविण्यात यावी.

**मा.महापौर साहेब :-** तरतूद करू

**मा.श्री.संपत बारस्कर :-** नगर शहराच्या पर्यटनाच्या दृष्टिने भिस्तबाग महाल हा भाग चांगला आहे. पर्यटन विकासासाठी रूपये १ कोटीची तरतूद करण्यात यावी. पाडव्यासाठी रसिक ग्रुप कार्यक्रम घेतात. या कार्यक्रमासाठी ३ लाख तरतूद करावी. नगरसेवक निधी १ लाख लाईटसाठी , ४ लाख विकासकामासाठी तरतूद करण्यात यावी. विकासभार, अंतर्गत सुधारणा ,लेआउट, बांधकाम सुधारणा यासाठी तरतूद वाढविण्यात यावी. ज्या भागाकरिता पैसे भरतात त्याच भागासाठी खर्च करण्यात यावा. ज्या भागातून नागरिक पैसे भरतात त्या भागात प्राधान्याने काम करण्यात यावी.

**मा.श्री.अविनाश घुले :-** नागरिक घरपट्टी बील भरावयास येतात त्यांना नंतर बोलविले जाते. नंतर का बोलविले जाते.

**श्री.झिने,रिव्हीजन विभाग प्रमुख :-** ०१-४-२०२० पासून नविन सॉफ्टवेअर नुसार बील अपडेट केले. बील वाटप झालेले नाही. १-१०-२०२० पासून बिले वाटपास सुरूवात केली आहे. यामध्ये त्या कर्मचा-याचे नांव दया मी चौकीशी करतो.

**मा.श्री.अविनाश घुले :-** एलबीटी अनुदानाची काय परिस्थिती आहे.

**मुख्यलेखाअधिकारी :-**७ कोटी ९८ लाख प्रति महिन्याला येतात. पगार विलंबाने झाला. मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा केला आहे. वर्षाल ९५ कोटी ९४ लाख प्राप्त झाले आहे. बॅकेचे कोड नंबर बदलले अनुदान १० तारखेपर्यत प्राप्त होते.ते जमा झाल्या झाल्या पगार व पेन्शन अदा केली जाते.

**मा.श्री.अविनाश घुले :-** उत्पन्नाच्या वाढीसाठी खास सभा घ्यावी आपल्याला पहिल्या पध्दतीप्रमाणे सोशल डिस्टन घेवून सभा घेण्यात आली तर सदस्यांना प्रश्न मांडता येईल. कायदयाच्या चौकटीत राहून पुढील सभा घेता आली तर बरे होईल.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** मा.केंद्र व मा.राज्य शासनाकडून मनपास प्राप्त होणा-या निधीतून , जिल्हा नियोजन व इतर विभागाकडून मनपास प्राप्त होणा-या निधीतून तसेच मनपाच्या निधीतून कामे सुचविण्याचा अधिकार मा.महापौर साहेब यांना देण्यात यावा.

**मा.महापौर साहेब :-** महापौर यांना अधिकार देण्यात येत आहे.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** पदाधिकारी शहर विकास निधीसाठी तरतूद करण्यात आलेली नाही. महापौर शहर विकास निधी २ कोटी, उपमहापौर, सभापती स्थायी समिती , सभागृह नेता शहर विकास निधी रू. ५० लाख तसेच विरोधीपक्ष नेता शहर विकास निधी २५ लाख ,सभापती मबाकस साठी २५ लाख व उपसभापती शहर विकास निधी १५ लाख निधीची तरतूद करण्यात यावी. सावेडी

गांवठाण वेश ते रासने नगर रस्त्यासाठी काही करता येईल का. गावठाणाच्या विकासासाठी महत्वाचा मुद्दा आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** या विषयास मी अनुमोदन देतो.

**मा.श्रीमती पल्लवी जाधव :-** गणेश कॉलनी ,सिध्दी विनायक कॉलनी, सावेडीतील रस्ता लवकरात लवकर व्हावा .

**मा.महापौर साहेब :-** ठिक आहे.

**मा.उपमहापौर साहेब :-** पा.नं. २४ वाहन भाडे प्रतिपुर्ती ही तरतूद कोणासाठी केली आहे.

**श्री.निकम, मेकॅनिकल इंजिनियर :-** मोटार व्हेईकल अंतर्गत वाहने भाडयाने लावतो . वाहन प्रतीपुर्ती या अधिकारी व पदाधिकारी यांच्या साठी ती प्रतीपुर्ती आहे.

**मा.उपमहापौर साहेब -** आपण प्रतिपुर्ती देतो का

**श्री.निकम, मेकॅनिकल इंजिनियर :-** बिले मो.व्हे.मार्फत सादर केली जातात. ऑडीट व अकौंट विभागाकडून कार्यवाही होत नाही.

**मुख्यलेखाअधिकारी -** २ महिन्या -- - स्थानिक लेखा मार्फत ऑडीट होते. त्यांनी आक्षेप घेतला वाहन प्रतीपुर्ती देय अनुज्ञेय नाही. यापूर्वीचे ऑडीटर यांनी आक्षेप घेतलेला आहे.

**मा.उपमहापौर सौ.मालन ढोणे :-** या अगोदरचे आयुक्त श्री.भालसिंग यांनी स्वतंत्र आदेश काढून प्रतिपुर्ती देण्याबाबत प्रशासनास सांगितले. जेव्हापासून थकीत आहे. तेव्हापासून देण्याबाबत आदेश दयावेत.

**मा.महापौर साहेब : -** कायदयात बसवून प्रतिपुर्ती देण्यात यावी.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** पाईप लाईन रोडसाठी कशातून तरी तरतूद करण्यात यावी. सावेडी उपनगरात स्मशानभुमी करण्यात यावी.

**मा.महापौर साहेब :-** सावेडी नदीच्या वर जागा निश्चित केली आहे. टीपी शी विचार विनीमय करून पुढील निर्णय घेवू

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** मनपाच्या जागेवर स्मशानभूमी करावी.

**मा.महापौर साहेब :-** ठिक आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** गेल्या वर्षी वसुली किती झाली. अपेक्षित किती

**श्री.झिने,रिव्हीजन विभाग प्रमुख :-** २०१९-२०२० या वर्षात रू. ५१ कोटी ५३ लाख वसुली झाली. सध्या १३ कोटी वसुली झाली आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** प्रभाग निहाय टार्गेट ठरवून दया. घरी जावून बिले दया. वसुल करा. जितकी वसुली करता येईल तितकी जास्त वसुली करा. सर्वांनी मिळून वसुलीकडे लक्ष देण्याची गरज आहे. - - - बोलवा तर पुढचा गाडा चालेल. टार्गेट ठरवून दया.

**मा.उपमहापौर साहेब :-** शास्ती माफी दया . भराभर वसुली होईल.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** कोरोनामुळे रोजगार नाही. शास्ती माफी दिल्यास वसुली होईल.

**श्री.झिने,रिव्हीजन विभाग प्रमुख :-** १९-१०-२०२० पर्यत २१० कोटी थकीत आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** मा.आयुक्त साहेब शास्ती माफी दयायची दया नाही नका देवू पण प्रभाग अधिकारी यांना टार्गेट दया. दंड करा काय कारवाई करावयाची ती करा.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** शेकडो प्रापर्टीची नोंद नाही. ओपन प्लॅाटच्या पट्टया भरतात. कंप्लीशन झाल्यानंतर कर्मचारी रिव्हीजन करून घेत नाही. जो कर्मचारी त्या भागात असेल त्यांना सुचना दया.

**श्री.झिने,रिव्हीजन विभाग प्रमुख :-** चौकशी करतो.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** सभेचे आयोजन करा. मनपाचे उत्पन्न वाढले तर कोणाकडे हात पसरवायची वेळ येणार नाही. ठेकेदाराचे बील थकणार नाही.

**मा.महापौर साहेब :-** सावेडी , केडगांव भागात कामाचा बॅकलॉक आहे. रस्ते नाहीत.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** शास्ती माफी करून वसुली लवकरात लवकर करावी.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** मालमत्ता हस्तांतराची कारवाई स्पीडने करावी.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** केडगांव साठी जास्तीत जास्त निधी दयावा.

**मा.श्री.अविनाश घुले :-** मागील बांधील खर्च किती

**मुख्यलेखाअधिकारी :-** मनपाला रू.७० ते ८० लाख टाकावी लागते. पगार व पेन्शन पोटी ६ कोटी रूपये लागतात पेन्शन २.२५ कोटी लागतात , २७ कोटीची तफावत असते.

**मा.श्री.अविनाश घुले :-** तफावती बाबत शासनाला काही मागणी केली का

**मुख्यलेखाअधिकारी :-** दरवर्षी जीएसटीच्या अनुदानात १० टक्के वाढ होत असते जीएसटीचे अनुदान पगार पेन्शनसाठी येत नाही. लाईट बील सरासरी रू.२.५० कोटी अकरा कोटी दरमहा बांधील खर्च येतो.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** शिस्ती माफीचा निर्णय घ्या.

**मा.महापौर साहेब :-** जि.प.कडे ४२ कोटी थकीत आहेत त्यांना भरावयास सांगा .

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** एखादया सक्षम अधिका-याची टिम नेमा स्वतंत्र यंत्रणा नेमा कोटीचे निर्णय बसवून मिटवता येतील.

**मा.महापौर साहेब :-** सावेडीतील शुभम मंगल कार्यालयाचे ३ कोटी पट्टी थकीत आहे. मोजमाप चुकल आहे.

**श्री.झिने,रिव्हीजन विभाग प्रमुख :-** एका बिलाचा निर्णय झाला. तो सांगतो दोन्ही बिलाचा निर्णय झाला असे तो सांगतो. एका बिलाचे कोर्टात प्रकरण आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** एका वर्षात घरपट्टीची किती येणे असते. वसुल किती होतो.

**श्री. झिने,रिव्हीजन विभाग प्रमुख :-** ४५ कोटी ३९ लाख . गेल्यावर्षी २७ कोटी ४५ लाख वसुल झाले.

**मा.महापौर साहेब :-** एक उपायुक्त दर्जाचा अधिकारी फक्त वसुलीसाठी नेमावा लागेल.

**मा.श्री.मनोज कोतकर :-**नविन आलेले सहा.आयुक्त यांचेकडे ते काम दिले तर ते प्रभावीपणे वसुली करतील.

**मा.श्री.गणेश भोसले :-** शाळा खोल्या जे भाडयाने दिल्या त्याची वसूली करा.

**मा.महापौर साहेब :-** एकदा आढावा घ्यावा.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** सन १७ मध्ये २१ कोटी आणि सन १९ मध्ये ३५ कोटी कशी झाली. शास्तीमाफी दिल्यामुळे कोरोनाचे कारण आहे.

**मा.महापौर साहेब :-** शास्ती माफी देण्याच्या दृष्टिने कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त साहेब :-** सर्व परिस्थिती बघीतल्यानंतर कोरोनाच्या अनुषंगाने कशी देता येईल व किती देता येईल बील वाटपाच्या अनुषंगाने शास्तीबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

**मा.श्री.भागानगरे :-** मोकाट जनावरे , कुत्र्याच्या बाबतीत या वर्षी गांर्भियाने घ्या. विभागाकडून काम व्हावे अशी अपेक्षा करतो.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** पाईप लाईन रोड वर पत्र्याचे छोटे छोटे शेड केले आहे.

**श्री.इथापे,प्र.शहर अभियंता :-** उपनगरात सर्व्हे केला खाजगी प्लॉटमध्ये बांधकाम परवानगी न घेता गाळे बांधले कोणते नियम पाळले नाही. १५०० गाळेधारकांना नोटीस सुध्दा दिल्या आहेत. ॲक्ट मध्ये दुप्पट दराने शास्ती लावू शकतो. टॅक्स लावून दप्पट दराने वसुल केले पाहिजे. यशोदा नगर १५ ते २० गाळे झाले आहे. उत्पन्न बुडते . कारवाई करणे गरजेचे आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** रोड पासून साईट मार्जीन असेल तर वसुल करा. पक्के बांधकाम केले असेल तर पाडा. एकतर पाडीत नाही यात राजकारण येते. अशा पत्र्याच्या गाळयांना डबल टिबल पट्टी लावा . रोडवर असेल तर काढून घ्या. रस्त्यास अडचण होत नसेल तर पट्टी वसुली करा. अधिकृत गाळयावाल्याकडून पट्टी वसुल करता अशा अनाधिकृत गाळेधारकांना सोडून देता. या मनपाच्या जागेत कॅन्टीन सुरू केल्यास वर्षाला एक ते सव्वा लाख भाडे वसुल होईल. दोन तीन जनांचे पगार होतील. काही अटी टाकून ठराव करून जागा दया. वर्षानु वर्षे जागा पडून आहे. तिथे बाभळी उगवल्या आहेत काही लोक अतिक्रमण करतात.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** त्या ठिकाणी नळ कनेक्शन दिले आहे ते बंद करा.

**मा.महापौर साहेब :-** मनपाच्या जागे जे कोणी गाळे मागतील त्यांना पण परवानगी दयायला लावू उत्पन्न वाढेल.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** मनपाच्या जागा वाटपासाठी त्रिस्तरीय समिती नेमली आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** उत्पन्न वाढीसाठी उपाय योजना करावी. उपायुक्त दर्जाचे अधिकारी नेमूण जास्तीत जास्त वसुली करण्याचा प्रयत्न करावा. नादुरूस्त गाळे ओपन स्पेस असतील त्या ठिकाणी गाळे भाडे तत्वावर देवून उत्पन्न होईल. मनपाचे उत्पन्न कसे वाढेल यासाठी प्रयत्न करा.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** मागील वर्षी कुत्र्यावर किती खर्च झाला.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** मागील वर्षी खर्च झाला नाही. मागील महिन्यापासून काम चालू केले आहे.

**मा.श्री.प्रकाश भागनगरे :-** आता किती तरतूद केली आहे.

**आरोग्याधिकारी श्री.बोरगे :-** २० -२१ दिवसात २९३ सर्जरी केल्या. यावर्षी कमीत कमी १ कोटी रूपये लागतील.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** ज्याचे निर्जीबीकरण केले जाते त्याची काही खूण केली जाते का बोगस बिले काढली जातात अशी आमच्याकडे माहिती आहे.

**आरोग्याधिकारी डॉ.बोरगे :-** ॲनिमल वेलफेअर बोर्डच्या सुचने नुसार ज्या काही सुचना आहेत त्यानुसार कार्यवाही केली जाते. एक कमिटी आहे पशुसंवर्धन विभाग दर १५ दिवसाला जे काही कामे केली जातात त्याची तपासणी केली जाते. कुत्र्याचे ऑपरेशन केल्यानंतर ३ दिवसापर्यंत देखरेखीखाली ठेवले जाते. कानाचा व्ही शेप तुकडा कापला जातो. ज्या भागातून कुत्रा नेला त्याच भागात सोडावे अशी संकल्पना आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** लाखो रूपये खर्च यासाठी करतो रस्त्यावर कुत्रे हिंडताना दिसतात. कोठेही कुत्रे कमी असल्याचे दिसत नाही. उलट रिझल्ट काहीच नाही. ठेकेदाराच्या घश्यात घालण्यासाठी काम चालू आहे.

**मा.महापौर साहेब :-** मोकाट जनावरे रस्त्यावर फिरतात. गाय ,म्हैस रस्त्यावर असतात कोंडवाडा लवकरात लवकर सुरू करा. यापुढे जनावरे रस्त्यावर दिसल्यास कारवाई करा. श्री. मिसाळ यांच्यावर ते ऑन लाईन १ वाजता आहे किंवा नाही हे तपासून शिस्तभंगाची कारवाई करावी

**मा.उपमहापौर सो.मालन ढोणे :-** कर्मचा-यांसाठी सानुग्रह अनुदान देण्यासाठी २ कोटीची तरतूद करावी.

**मा.महापौर साहेब :-** ठिक आहे.

सन २०१९-२०२० चे सुधारित व सन २०२०-२०२१ सालचे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा.महासभेत झालेली चर्चा त्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात मा.महासभेने सुचित केलेले बदल, दुरूस्त्या व फेर फार यासह ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी. या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता कायर्वाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच अंदाजपत्रकाच्या २०० प्रति छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर

## मा.महापौर साहेब यांचे मनोगत

अहमदनगर शहराचे ग्राम दैवत श्री विशाल गणपती व महाराष्ट्राचे कुलस्वामिनी आई तुळजाभवानी, संत ज्ञानेश्वर महाराज, जगतगुरू संत तुकाराम महाराज व राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आर्शिवादाने , तसेच महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचाराने नागरिकांना चांगल्या नागरी सुविधा देण्यासाठी पंतप्रधान मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब, माजी केंद्रीय मंत्री मा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब, विरोधीपक्ष नेते मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, केंद्रीय मंत्री मा.ना.श्री.रावसाहेब दानवे साहेब, भाजपा प्रदेशाध्यक्ष मा.श्री.चंद्रकांतदादा पाटील साहेब, विधानपरिषदेचे विरोधीपक्ष नेते मा.ना.श्री.प्रविणजी दरेकर साहेब, अहमदनगर जिल्हा पालकमंत्री मा.ना.श्री.हसनजी मुश्रीफ साहेब, मा.खा.डॉ.श्री. सुजयजी विखे पा.साहेब, माजी मंत्री मा.आ.श्री.राधाकृष्णजी विखे पाटील साहेब माजी खासदार मा.श्री.दिलीपजी गांधी साहेब, मा.आ.श्री.अरूणकाका जगताप साहेब, मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप साहेब, माजी मंत्री मा.श्री.शिवाजीराव कर्डिले साहेब, माजी मंत्री मा.श्री.रामजी शिंदे साहेब, मनपाचे कामकाज करताना सर्व मनपा पदाधिकारी, सर्व सहकारी

नगरसेवक नगरसेविका आपले मार्गदर्शन व सहकार्य तसेच अधिकारी व कर्मचारी वर्गाचे सर्वतोपरी सहकार्य मला मिळत आहे. शहराचा विकासाचा अनुशेष मोठा आहे. परंतु या आर्थिक वर्षामध्ये जागतिक महामारीमुळे अहमदनगर महानगरपालिकेस कोरोना प्रादुर्भावामुळे आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत कमी झाले आहे. अशाही परिस्थीतीमध्ये शहरातील कोरोना रूग्णांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच काही अत्यावश्यक कामे देखील करण्यात आली. महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांच्या नागरी सुविधा देण्याचा प्रयत्न करित आहे. मी अहमदनगर महानगरपालिकेचे सन 2020-2021 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक घेवून आपणा समोर येत आहे.

या आर्थिक वर्षामध्ये नागरिकांना नागरी सुविधा देताना शहर व उपनगराच्या विकासाच्या दृष्□ीने व आपणा सर्वाच्या सहकार्याने तसेच शहर सुधार समिती, सर्व सामाजिक संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या सहकार्याने शहराचा विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी, मनपाचा इतर खर्च कमी होण्याच्या दृष्टिने प्रयत्न करण्यात येणार आहे.

- शहराच्या सौंदर्यात भर पडण्याच्या दृष्टिने सीनानदीच्या कडेने हरितपट्□ा विकसीत करण्यात येणार आहे. लवकरच कामास सुरूवात करण्यात येणार आहे.
- शहारातील नागरिकांना माफक दरामध्ये एमआरआय स्कॅन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टिने जिल्हा नियोजन अंतर्गत निधीमधून अत्याधुनिक एमआरआय स्कॅन मशिन सावेडी येथील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथे बसविण्यात येणार आहे.
- कै.बा.देशपांडे दवाखान्यातील रक्तपेढी खाजगी संस्थेस चालविण्यास देण्याचा मानस असून शहरातील गोर गरिब रूग्णांना कमीत कमी दरामध्ये रक्त पिशवी उपलब्ध व्हावी हा त्यामागील उद्देश आहे. सदर बाबत प्रशासनाला कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या.
- चितळे रोड येथील नेहरू मार्के□ इमारत व सावेडी शॉपिंग कॉम्प्लेक्स मनपाच्या किंवा मा.शासनाच्या निधीतून बांधण्यात येणार आहे. मा.शासनाकडे निधीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल. सदर इमारतीचे बांधकाम झाल्यास शहरातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होवून मनपाचे उत्पन्नात देखील वाढ होईल.
- सावेडी गांव येथील मनपाची जागेत अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधण्याचा मानस आहे. यामुळे मनपाच्या उत्पन्न वाढण्यास मदत होईल.
- नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक व सुरळीत होण्यासाठी पाण्याचा उपसा वाढविण्यासाठी अमृत योजने अंतर्गत सुरू असलेल्या कामास गती देण्यात आली आहे. लवकरच काम पूर्ण होणार आहे.
- शहरी भुयारी ग□र योजनेचे काम सुरू असून त्या कामास गती देण्यात आलेली आहे.

- नगर शहर स्वच्छता अभियाना मध्ये बक्षिस पात्र ठरले असून नागरिकांनी असेच सहकार्य ठेवून आपले शहर स्वच्छ व सुंदर ठेवावे. मनपा मार्फत शहर स्वच्छतेसाठी सर्वोत्तपरी प्रयत्न करित आहे.
- मनपाची पिंपळगांव माळवी येथील जागेत मनपाचे उत्पन्नाचे दृष्टिने चांगला प्रकल्प उभारण्याच्या दृष्टिने कार्यवाही सुरू आहे.
- शहरातील मोका□ कुत्र्याचा बंदोबस्त करण्याची कार्यवाही करण्यात आलेली असून मोका□ कुत्र्यांचा प्रश्न सु□ण्यास मदत झाली आहे.
- अहमदनगर महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत केडगांव येथे 162 घरे व का□वन खंडोबा येथे 192 घरांचे बांधकामाचे काम सुरू करण्यात आले आहे.
- मनपाच्या ज्या कर्मचा-यांकडे स्वत:चे सदनिका नाही अशा वर्ग 3 व 4 श्रेणीतील कर्मचा-यांसाठी सदनिका बांधणेचा मानस आहे. याकरिता जागा उपलब्धतेसाठी नगररचना विभागास सुचना देण्यात आलेल्या आहेत.
- अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-2 योजनेचे काम अनेक वर्षापासून सुरू असून या विभागची बैठक घेवून योजनेच्या कामास गती देण्यात आली असून ज्या भागात काम पूर्ण झाले असेल अशा भागातील पाणी पुरवठा वितरणाबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या असून अशा भागात नागरिकांना पाणी वितरणाचे काम करण्याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

सन 2020- 2021 चे अंदाजपत्रक प्रशासनाने तयार करून मा.महासभेपुढे सादर केले आहे. महानगरपालिका उत्पन्नाचे स्त्रोत तसेच नागरिकांच्या नागरी सुविधेसाठी आवश्यक असणारा निधी याचा विचार करता मा.शासनाकडून मोठया स्वरूपात निधीची मागणी करण्यात आलेली असून मा.शासनाकडून निश्चितपणे निधी उपलब्ध होणार आहे. त्यामधून शहराचा विकास निश्चित होईल. यामाध्यमातून शहरातील नागरिकांना मुलभूत सविधा मिळण्यास मदत होणार आहे.

या सर्वाचा विचार करून या शहराचे नागरिक निश्चितपणे मनपास सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे. तसेच आपल्या सर्वाचे मार्गदर्शन व सहकार्य याची अपेक्षा करित असून ते आपणा सर्वानकडून निश्चित मिळेत या अपेक्षेसह उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व पत्रकार बंधू व इलेक्ट्रॉनिक मिडीया यांचे प्रतिनिधी यांनी माझे मनोगत शांतपणे ऐकून घेतले त्याबद्दल अभार.

जय हिंद जय महाराष्ट्र

सही/-

बाबासाहेब वाकळे,

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका

**ठराव :-**

सन २०१९-२०२० चे जमा व खर्च बाजूमध्ये सुधारीत व सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रकाबाबत सुचना, दुरूस्त्या व फेरफार व शिफारशीसह तसेच मा.महासभेमध्ये मा.सदस्यांनी केलेल्या सुचना व दिलेले पत्र तसेच दुरूस्त्या फेरफार यासह अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मा.महासभेमध्ये प्रामुख्याने झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे मुद्यांबाबत कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

- अहमदनगर मनपा हद्दीमध्ये नविन बांधकाम झालेले आहेत. सदर बांधकामाचे मनपा कर्मचा-यां मार्फत मोजमापे घेवून त्यांना आकारणी करण्याबाबत कार्यवाही करावी. याकामास प्राधान्य देण्यात यावे. घरपट्टी वसुली प्रभावीपणे राबविणेत यावी. त्यातुन मिळणा-या नविन घरांची नोंदी घेवून त्यांची आकारणी करावी. त्यातुन अंदाजे १०.०० कोटी सर्वसाधारण कर अपेक्षित उत्पन्न धरण्यांत यावे. तसेच शहर व उपनगरातील ज्या नळधारकांना पाणीपट्टी आकारली नाही. त्यांना पाणी पट्टी आकारणी करणेत यावी. त्यातुन अपेक्षित ३.०६ कोटी ही नळ धारकांकडुन जमा पाणीपट्टी या लेखाशिर्षात वाढविण्यांत यावी.
- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यातील रक्तपेढी ची सुविधा गोरगरिब नागरिकांना कमीत कमी दरामध्ये रक्त पिशवी उपलब्ध होण्याच्या दृष्टिने खाजगी संस्थेस चालविण्यास देण्याबाबत प्रशासनाने योग्य ती पुढील कार्यवाही करावी.
- नगर शहर पर्यटन विकास या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये ५० लाखाची तरतूद करण्यात यावी.
- शहरातील रस्ता बाजू फी वसुली बाबत निविदा प्रक्रिया झाली होती कोरोनाच्या कालावधीमुळे पुढील प्रक्रियेस बराच विलंब झाल्यामुळे मा.सदस्यांनी मांडलेल्या सुचनेनुसार सदरच्या निविदा रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया प्रशासनाने करावी.
- महासभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार वृक्षप्राधिकरण समिती गठीत करण्यासाठी सर्व पक्षिय सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी. याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.
- बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा या लेखाशिर्षांतर्गत रक्कम रूपये २५ लाखाने तरतुद वाढविण्यांत यावी.
- विकासभार या लेखाशिर्षात रक्कम रूपये ४ कोटी ५० लाखाची तरतूद आहे. परंतु भूसंपादनासाठी रकमेची गरज पाहता विकास भार या लेखाशिर्षात रक्कम रूपये ४२ कोटी तरतूद करण्यांत यावी.
- उपनगरासाठी भुयारी गटार योजना राबविणेकामी मा.केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा.
- पिंपळगांव माळवी येथील मनपाच्या जागेत पर्यटनाच्या दृष्टिने प्रकल्प उभारणे कामी प्रस्ताव तयार करण्यात यावा. या ठिकाणी प्रकल्पासाठी मा.केंद्र शासनाकडे निधीसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा.

- सावेडी परिसरासाठी स्मशानभूमी उभारणे ही गेल्या अनेक वर्षापासून नागरिकांची मागणी आहे या दृष्टिने नगररचनाकार व मा.आयुक्त यांनी याबाबत लक्ष घालून याबाबत योग्य ती कार्यवाही करणेसाठी टीडीआर अथवा भूसंपादनाच्या माध्यमातील कार्यवाही प्रशासनाने लवकरात लवकर करून व जागा ताब्यात घेवून स्मशानभूमी उभारण्याच्या दृष्टिने कार्यवाही करावी. सदर कामास प्राधान्य देण्यात यावे.
- महापौर शहर विकास निधी रक्कम रूपये २ कोटी , उपमहापौर शहर विकास निधी रक्कम रूपये ५० लाख, सभापती स्थायी समिती शहर विकास निधी रक्कम रूपये ५० लाख, सभागृह नेता शहर विकास निधी रक्कम रूपये ५० लाख, विरोधीपक्ष नेता शहर विकास निधी रक्कम रूपये २५ लाख, सभापती महिला व बाल कल्याण शहर विकास निधी रक्कम रूपये २५ लाख, सभापती महिला व बाल कल्याण शहर विकास निधी रक्कम रूपये १५ लाख या लेखाशिर्षा अंतगर्त तरतूद करण्यात यावी.
- सावेडी गांव येथील मनपाच्या जागेत अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधणे बाबत प्रशासनाने प्रस्ताव तयार करावा व याकरिता मा.शासनाकडे निधीची मागणी बाबत प्रस्ताव सादर करावा.
- रसिक ग्रुप अहमदनगर यांना सांस्कृतिक कार्यक्रमासाठी रक्कम रू. दोन लाख अर्थ सहाय्य देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मागणी केलेल्या संस्थाचे धर्मदाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत असलेबाबत कागदपत्र, ताळेबंद व चार्टड अकौंट यांचेकडील हिशोब तपासणी आदी आवश्यक कागदपत्रांची खातरजमा करूनच संस्थाना अर्थ सहाय्य देणे बाबत कार्यवाही करणेत यावी. सदरचा खर्च सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.
- चितळे रोड येथील नेहरू मार्केटच्या जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्स व सावेडी शॉपिंग कॉम्प्लेक्स मनपाच्या निधीतून किंवा मा.शासनाच्या निधीतून बांधणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. मा.शासनाकडे याकामी निधी उपलब्ध होण्यासाठी देखील प्रस्ताव सादर करावा.
- उपमहापौर मा.सौ.मालनताई ढोणे यांनी सभागृहामध्ये मांडलेल्या सुचनेनुसार मनपाच्या अधिकारी व कर्मचारी करिता दिवाळी सणाकरिता सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षात रक्कम रूपये दोन कोटीची तरतूद करण्यात यावी.
- सभागृह नेता मा.श्री.स्वप्निल शिंदे यांनी मा.महासभेमध्ये मांडलेल्या सुचनानुसार मा.शासनाकडून विविध विकास कामांसाठी विविध योजने अंतर्गत मनपास निधी मंजूर करण्यात येतो. सन २०२०-२०२१ साठी प्राप्त होणा-या मुलभूत / प्राथमिक सोयी सुविधा विकास निधी , रस्ता अनुदान, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर), नागरी दलित वस्ती सुधार योजना, अल्पसंख्याक बहुलक्षेत्र विकास निधी, नागरी दलितेतर विकास निधी , १५ वा वित्त आयोग, नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत निधी तसेच इतर कोणताही निधी, मनपा निधी आदी मा.शासनाच्या निधीतील कामे सुचीत करण्याचा अधिकार मा.महापौर साहेब यांना देण्यात येत आहे यास ही सभा मान्यता देत आहे.
- मा.सदस्यांनी मांडलेल्या सुचने नुसार वसुल झालेला वृक्ष कर वृक्ष लागवडीसाठी वापरण्यात यावा. वसुल झालेला वृक्षकर साठी स्वतंत्र खाते करण्यात यावे.

- मा.सदस्य यांच्या प्रभागात विकास कामांसाठी निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टिने त्यांच्या मागणी नुसार सदस्य स्वेच्छा निधी  व वॉर्ड विकास निधी दोन्ही मिळून प्रत्येकी सदस्यास रक्कम रूपये १५ लाख तरतूद करणेसाठी वॉर्ड विकास निधीची ४ कोटी ९९ लाख तरतुद करावी. सदर निधीतील विकास कामांची देयके तातडीने देण्याच्या दृष्टिने तरतूद स्वतंत्र ठेवून देयके तातडीने देणे बाबत अर्थ विभागाने कार्यवाही करावी.
- मा.श्री.अविनाश घुले नगरसेवक यांनी  सभागृहामध्ये मांडलेल्या सुचनेनुसार कानडे मळा, कोंबडीवाला मळा रस्त्यासाठी रक्कम रूपये २० लाख खर्चाची तरतूद नविन रस्ते विकसीत करणे यामध्ये वाढ करण्यात यावी.
- मा.श्री.स्वप्निल शिंदे सभागृह नेता यांनी  दिलेल्या  पत्रानुसार अग्निशमन सुरक्षा साहित्य खरेदी या लेखाशिर्षात  रक्कम रूपये १ कोटीची तरतूद करण्यात यावी.
- मा.श्री.प्रकाश भागानगरे  नगरसेवक यांनी  सभागृहामध्ये मांडलेल्या सुचनेनुसार सारस पुल व रस्त्यासाठी रक्कम रूपये २० लाखाची तरतूद पुल बांधणे व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये वाढ करण्यात यावी.
- मा.श्री.गणेश भोसले  नगरसेवक यांनी  दिलेल्या पत्रानुसार नागरी सुविधा विकास कार्यक्रम या लेखाशिर्षात रक्कम रूपये ५ लाखाची तरतूद करण्यात यावी
- महासभेत झालेल्या चर्चेनुसार घरपट्टी जास्तीत जास्त वसुली होण्याच्या दृष्टिने मालमत्ता धारकांना शास्ती माफी दिल्यास वसुलीत  निश्चित वाढ होईल या दृष्टिने मा.आयुक्त यांनी  शास्ती माफी देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.
- बुरूडगांव कचरा डेपोशी निगडीत असणारे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे ,पुल दुरूस्त करणे, रस्ता करणे योग्य तो प्रस्ताव तयार करून हे काम १४ व्या वित्त आयोगातून करण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.
- मा.उपमहापौर व मा.सदस्य यांनी सभागृहात केलेल्या सूचनेनुसार वाहन प्रतिपुर्ती देयके मा.पदाधिकारी व अधिकारी यांचे थकीत देयकासह अदा करणे बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
- मा.स्थायी समिती विषय क्रमांक १२ दिनांक २१/०७/२०२० रोजीचा ठराव रद्द करुन महानगरपालिकेचे कै.प्रमोद महाजन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या वाढीच्या दृष्टीने खाजगी करणाच्या माध्यमातुन चालविण्यास देण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.
- मा.शासनाकडुन महानगरपालिकेस १५ वा वित्त आयोगाच्या निधी करीता अंदाजपत्रकात तरतुद नसल्याने जमा व खर्च बाजुस रक्कम रु.१०.०० कोटींची तरतुद करण्यांत यावी.
- माध्यमिक शिक्षण (कर्मचारी मानधन) रक्कम रु.१.०० लाख, ऑफिस छपाई रक्कम रु.२.०० लाख, आरोग्य छपाई रक्कम रु.२.०० लाख, मार्केट छपाई रक्कम रु.१.०० लाख, वसुली छपाई रक्कम रु.१.०० लाख लेखाशिर्षांतर्गत तरतुद करण्यांत यावी.
- उद्यान व कारंजे दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु.५.०० लाखाची तरतुद करण्यांत यावी.

- मा.श्री.संपत बारस्कर, विरोधीपक्ष नेता यांनी केलेल्या सूचनेनुसार प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौक या रस्त्यास वनश्री बलभिमराव डोके (आण्णा) असे नामकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदरचा नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.
- महानगरपालिकेच्या हद्दीत अनधिकृतपणे रस्ता फोडणे, पाईप लाईन टाकणे, विद्युत पोल उभे करणे अशी कामे केल्यामुळे महानगरपालिकेला विकास कामे करतांना अडथळे निर्माण होतात व त्याचा त्रास सामान्य नागरिकांना होतो. याकरीता महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, बीएसएनएल, पीडब्ल्यूडी, बी ॲण्ड सी, एरिगेशन, पोलीस विभाग इत्यादी शासकीय निमशासकीय विभागाकडून तसेच खाजगी संस्थेकडून जी कामे महानगरपालिका कार्यक्षेत्रात केली जातात त्या कामांना येथुनपुढे महानगरपालिकेची परवानगी / ना-हरकत दाखला आवश्यक तथा बंधनकारक करण्यांत येत आहे. यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच अशी विकास कामे करीत असतांना लाईन आउटही महानगरपालिकेकडून अंतिम केल्यानंतरच प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात करणेही संबंधितांवर बंधनकारक करण्यांत येत आहे. संबंधित संस्थेने महानगरपालिकेचे ठरावाचे अंमलबजावणी न केल्यास संबंधित संस्थेवर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे आर्थिक नुकसान केलेनुसार कायदेशीर कारवाई करण्यांत यावी. सदर बाबत प्रशासनाने संबंधितांना लेखी पत्राव्दारे कळविण्यांबाबत कार्यवाही करावी. ठरावाची अंमलबजावणी करणे बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.
- कै.बा.दे.दवाखाना येथील दैनंदिन कपडे धुलाईच्या कामाचे जनता ड्रायक्लिनर्स, अहमदनगर यांचे माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१८ या कालावधी मधील थकीत देयके रक्कम रु.२,११,४९२/- अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.
- केंद्र शासनाच्या अमृत अभियान अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेच्या उर्वरीत परिसर(शहरउपनगरे) साठी भुयारी गटार योजना टप्पा-२ राबविणे करिता ही सभा मान्यता देत आहे.या कामाचा प्रकल्प अहवाल तयार करणे, मा.शासनास सादर करणे, या कामासाठी महानगरपालिकेचा हिस्सा भरणे, गरजेनुसार महानगरपालिका मा.शासनाकडील निधी, कर्ज, रोखे, बँका, खाजगी वित्तीय संस्था यांच्या माध्यामातून कर्ज उभारणे, मा. महापौर , मा.आयुक्त यांना करार / सामंजस्य करार करणेसाठी स्वाक्षरी करणेसाठी प्रधिकृत करणे, मा. शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार योजना राबविणेसाठी व याकामासाठी येणा-या खर्चासाठी ही सभा मान्यता देत आहे.

सन २०१९-२०२० चे सुधारित व सन २०२०-२०२१ सालचे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा.महासभेत झालेली चर्चा त्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात मा.महासभेने सुचित केलेले बदल, दुरूस्त्या व फेर फार यासह व सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे मान्यता देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी. या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता कायर्वाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच अंदाजपत्रकाच्या २०० प्रति छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर,
अनुमोदक :- मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम,
ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन २०२०-२०२१ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतूद | सर्वसाधारण सभेने केलेला बदल | | मा.सर्व साधारण सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नगरशहर पर्यटन विकास निधी | ५.०० | ४५.०० | | ५०.०० |
| २ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | २५.०० | २५.०० | | ५०.०० |
| ३ | विकासभार निधीतून खर्च (नगररचना भूसंपादन) | ३३७.५० | २८१२.५० | | ३१५०.०० |
| ४ | विकास भार | ११२.५० | ९३७.५० | | १०५०.०० |
| ५ | महापौर शहर विकास निधी | ०.०० | २००.०० | | २००.०० |
| ६ | उपमहापौर शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| ७ | सभापती स्थायी समिती शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| ८ | सभागृह नेता शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| ९ | विरोधीपक्ष नेता शहर विकास निधी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| १० | सभापती, महिला व बालकल्याण निधी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| ११ | उपसभापती, महिला व बालकल्याण निधी | ०.०० | १५.०० | | १५.०० |
| १२ | कर्मचारी सानुग्रह अनुदान | ५.०० | १९५.०० | | २००.०० |
| १३ | वॉर्ड विकास निधी | ०.०० | ४९९.०० | | ४९९.०० |
| १४ | नविन रस्ते विकसीत करणे | ७५.०० | २०.०० | | ९५.०० |
| १५ | अग्निशमन सुरक्षा साहित्य खरेदी | ५.०० | ९५.०० | | १००.०० |
| १६ | पुल बांधणे व दुरुस्ती | २०.०० | २०.०० | | ४०.०० |
| १७ | नागरी सुविधा विकास कार्यक्रम | ०.०० | ५.०० | | ५.०० |
| १८ | १५ वा वित्त आयोग | ०.०० | १०००.०० | | १०००.०० |
| १९ | उद्यान व कारंजे दुरुस्ती | ०.०० | ५.०० | | ५.०० |
| २० | माध्यमिक शिक्षण-कर्मचारी मानधन | ०.०० | १.०० | | १.०० |
| २१ | ऑफिस छपाई | ०.०० | २.०० | | २.०० |
| २२ | आरोग्य छपाई | ०.०० | २.०० | | २.०० |
| २३ | मार्केट छपाई | ०.०० | १.०० | | १.०० |
| २४ | वसुली छपाई | ०.०० | १.०० | | १.०० |
| | | | | | |
| | | **५८५.००** | **६०८१.००** | **०.००** | **६६६६.००** |

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

| अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मा.सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला सन २०२०-२०२१ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात) | | | | | |
| | | | | | |
| सुरुवातीची शिल्लक (दि.०१/०४/२०२०) ..................................३५३.१० | | | | | |
| एकुण जमा ...............................................................७७२९९.७८ | | | | | |
| सुरुवातीचे शिलकेसह एकुण जमा......................................७७६५२.८८ | | | | | |
| एकुण खर्च ...............................................................७७३२९.४८ | | | | | |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि.३१/३/२०२१)................................३२३.४० | | | | | |
| अ.नं | लेखाशिर्ष (जमा बाजू) सन २०२०-२०२१ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतूद | सर्वसाधारण सभेने केलेला बदल | | मा.सर्वसाधारण सभेने मंजूर केलेली तरतूद |
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | १५ वा वित्त आयोग | ०.०० | १०००.०० | | १०००.०० |
| २ | विकास भार | ४५०.०० | ३७५०.०० | | ४२००.०० |
| ३ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | २५.०० | २५.०० | | ५०.०० |
| ४ | सर्वसाधारण कर | ३४१०.०० | १०००.०० | | ४४१०.०० |
| ५ | नळ धारकांकडुन जमा पाणीपट्टी | १८००.०० | ३०६.०० | | २१०६.०० |
| | | | | | |
| | **एकुण** | **५६८५.००** | **६०८१.००** | **०.००** | **११७६६.००** |

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.